**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १२६ रविवार, दि. २९ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### देशात प्रथमच मोबाइल ॲपद्वारे मतदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बिहार / पटना :** देशात पहिल्यांदाच मोबाइल ॲपद्वारे मतदान होत आहे. बिहारमधील २६ जिल्ह्यांमधील ४२ नगरपालिकांमध्ये पोटनिवडणुका होत आहेत. पायलट प्रोजेक्ट म्हणून सहा नगरपालिकांमध्ये ई-व्होटिंग केले जात आहे. मतदान केंद्रांवर पोहोचू न शकणाऱ्यांना मतदानाची सोय व्हावी यासाठी हा प्रकल्प करण्यात आला आहे. मतदानासाठी दोन ॲप्स लाँच करण्यात आले आहेत. ही सुविधा मिळविण्यासाठी आगाऊ नोंदणी करावी लागत होती. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ५० हजारांहून अधिक लोकांनी ई-मतदानासाठी नोंदणी केली होती. सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत ई-मतदान झाले. दुबई, कतारसारख्या देशांमध्ये राहणाऱ्या स्थलांतरित बिहारींनीही ॲपद्वारे मतदान केले.

### विमानात एअर होस्टेसचा विनयभंग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जयपूर :** दुबईहून जयपूरला येणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानात एका प्रवाशाने एका महिला क्रू मेंबरचा (एअर होस्टेस) विनयभंग केला. प्रथम त्याने फ्लाइटमध्येच दारू प्यायली. महिला क्रू मेंबरने नकार दिल्यावर त्याने गैरवर्तन करण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे. त्याने दारूच्या नशेत गोंधळ घातला. मागून तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्शही केला. जयपूरच्या विमानतळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. सध्या आरोपी तरुण पोलिसांच्या ताब्यात आहे.

### संसदीय समिती जम्मू-काश्मीर दौऱ्यावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीनगर :** सार्वजनिक प्रशासन आणि कायदा आणि न्याय विषयक संसदीय समिती शनिवारी जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यावर आली. समितीचे सदस्य वैष्णोदेवीला रवाना झाले आहेत. त्यानंतर ते पहलगामलाही भेट देऊ शकतात. समितीचे अध्यक्ष भाजप खासदार आणि माजी पोलिस महासंचालक ब्रिजलाल म्हणाले की, आतापर्यंत ६-७ खासदार जम्मूला पोहोचले आहेत आणि उर्वरित लोक श्रीनगरमध्ये सामील होतील. ही समिती जम्मू-काश्मीरमधील सरकारी कामकाज, कायदा आणि न्याय आणि लोकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेईल. त्यांनी सांगितले की समिती दोन दिवस जम्मूमध्ये राहील आणि नंतर श्रीनगरला जाईल. या काळात ते पहलगामला जाण्याचा प्रयत्न करतील.

# पालिका निवडणुकांमुळे हिंदीला विरोध

## उद्धव ठाकरेंच्या विरोधामागे राजकारणच असल्याचा फडणवीसांचा दावा

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून काढण्यात येत असलेल्या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. ही केवळ राजकीय भूमिका आहे असे मी म्हणणार नाही. कोणाच्याही समोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. मात्र महानगरपालिकेच्या निवडणुका नसत्या तर कदाचित इतका वेगळ्या पद्धतीने विरोध झाला नसता. असा दावा फडणवीस यांनी केला आहे.**

मनसे प्रमुख राज ठाकरे हे माझे चांगले मित्र आहेत. म्हणून काय झाले? मात्र त्यांच्या काही भूमिका आहेत. तर माझ्या काही भूमिका आहेत. सर्वांच्या सारख्या भूमिका असत्या तर सर्व एका पक्षात राहिले असते. त्यामुळे भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र उद्धव ठाकरे यांनी जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि आता त्याच्या विरोधात ते बोलताय, तर याचा अर्थ केवळ राजकीयच आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का?



असा प्रतिप्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे.

देवेंद्र फडणवीस यांना राजकारण करायचय, त्यामुळे देवेंद्र फडणवीस काहीतरी करतोय. मात्र या लोकांना देखील राजकारण करायचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा लोकांनी जर एखादा रिपोर्ट दिला आणि तो तुम्ही स्वीकारला आहे. आता तुम्ही त्यालाच विरोध करता? याचा अर्थ मराठीचा प्रेम नाही तर राजकारण असल्याचा स्पष्ट आरोप देखील फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयामागचे कारणही सांगितले. यामागे एक सायंटिफिक प्रोसेस आहे. या प्रोसेस मध्ये आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे, या दृष्टिकोनातून तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. ते तयार करत असताना विद्यार्थ्यांची बुद्धी सर्वात जास्त कधी चालते, भाषा शिकण्याची शक्यता कधी अधिक असते. या संदर्भातले रिसर्च करून त्या कालावधीमध्ये त्यांना भाषा शिकवल्या तर ते अधिकच्या भाषा शिकू शकतात, अशा प्रकारचा मुद्दा समोर आला. हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. कुठलीही भाषा शिका, हिंदीच शिकली पाहिजे असे नाही. हे आम्ही एका मिनिटात सांगितले. हिंदी सक्तीला यांचा विरोध नाही तर यांचा विरोध केवळ हिंदीला आहे. भारतामध्ये तुम्हाला इंग्रजी चालते, तीला तुमचा विरोध नाही. परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का

पान ४

### मुद्दा भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजण्याचा

राज्यातील संस्थांमध्ये ॲडमिशन तुम्ही ठरवाल. मात्र राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये सर्व निवड सिईटीने होत आहे. यात आपण मराठी मुलांचे नुकसान करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. हा मुद्दा भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजून घ्यायचा आहे, असे आवाहन देखील त्यांनी केले.

### गुजरातमध्येही तिसरीपासून हिंदी भाषा

महाराष्ट्रातील काही विद्वानांनी गुजरातमध्ये तिसरी भाषा शिकवली जाते का? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र, गुजरात राज्यामध्ये देखील तिसऱ्या वर्गापासून हिंदी भाषा शिकवली जात आहे. हिंदीला त्यांनी संस्कृत आणि इतर भाषांचे देखील पर्याय दिलेले आहेत. असे मुख्यमंत्री म्हणाले.

# वैजापूर तालुक्यात एकाच महिन्यात तीन हत्या

## महिला कीर्तनकाराची क्रूर हत्या, दगडाने ठेचून केला खून...

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर-गंगापूर महामार्गावरील चिंचडगाव येथील सद्गुरु नारायणगिरी कन्या आश्रमात राहणाऱ्या ह.भ.प. संगीताताई पवार (वय ५०) यांची अज्ञात व्यक्तींनी डोक्यात दगड घालून क्रूरपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना शुक्रवारी (दि. २७) मध्यरात्री ११ ते १२वाजण्याच्या सुमारास घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. चोरीच्या उद्देशाने आश्रमात घुसलेल्या अज्ञातांनी ही हत्या केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

संगीताताई पवार या मागील दोन महिन्यांपासून चिंचडगाव येथील सद्गुरु नारायणगिरी कन्या आश्रमात वास्तव्यास होत्या. त्या अविवाहित असून, त्यांनी संन्यास स्वीकारला होता. परिसरात त्या कीर्तनकार म्हणून ओळखल्या जात होत्या आणि नियमितपणे किर्तनाचे कार्यक्रम



करत असत. दररोज रात्री त्या आश्रमातील आपल्या खोलीतच झोपत असत; परंतु बुधवारी रात्री त्या खोलीबाहेर झोपल्या होत्या, अशी माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी मध्यरात्री ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात व्यक्तींनी आश्रमाचे गेट आणि कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरीच्या उद्देशाने आलेल्या या व्यक्तींनी संगीताताई पवार यांच्या डोक्यात मोठा दगड टाकून त्यांची हत्या केली. यावेळी आश्रमाजवळील मोहटा देवी मंदिराची दानपेटीही चोरीला गेल्याचे नंतर उघडकीस आले.

गुरुवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मोहटा देवी मंदिराचे पुजारी शिवाजी चौधरी आश्रम परिसरात आले असता त्यांना आश्रमाचे गेट आणि कुलूप तोडलेले दिसले. आत प्रवेश केल्यानंतर त्यांना संगीताताई

पान ४

### शिकारे पिता पुत्राच्या मृत्यूची उच्चस्तरीय

# चौकशी करण्याचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील शिकारे वस्ती बाळगव्हाण येथील ग्रामपंचायत सदस्य काकासाहेब शिकारे व त्यांचा पुत्र महेश शिकारे यांचा शेतामध्ये खते टाकत असताना विजेच्या ताराला चिटकल्याने करंट बसून मृत्यू झाला होता. यासंदर्भात कामात हलगर्जीपणा केल्यामुळे वायरमन शितल हुलगुंडे याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा खर्डा पोलीस स्टेशनला दाखल झाला आहे.

याबाबत विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी शिकारे कुटुंबाची सांत्वन भेट घेतली असता, त्यांनी शिकारे पिता पुत्राच्या मृत्यूची उच्चस्तरीय



चौकशी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी येथील शेतकऱ्यांनी खर्डा वीज वितरण कक्षाचे कनिष्ठ अभियंता कांडेकर हे कार्यालयात कधीच हजर राहत नाहीत, ते कामात हलगर्जीपणा करतात, वादळी पावसात पडलेले खांब उभे करणे, तुटलेल्या तारांची जोडणी करण्यासाठी आर्थिक मागणी वायरमन करतात इत्यादी तक्रारी यावेळी त्यांनी केल्या,तदनंतर लगेच सभापती शिंदे यांनी वीज वितरणचे अधीक्षक अभियंता यांना फोन करून खर्डा कनिष्ठ अभियंता कांडेकर यांची बदली करण्याचे निर्देश दिले. तसेच शिकारे कुटुंबाला शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

यावेळी जेष्ठ नेते प्रा.मधुकर राळेभात, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र

पान ४

# हिंदी सक्तीवर संतापल्या सुप्रिया सुळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर :** हिंदीच्या सक्तीविरोधात राज व उद्धव ठाकरे यांनी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चाला शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानेही पाठिंबा दिला आहे. या प्रकरणी राज्याचे राजकारण ढवळून निघत असताना खासदार सुप्रिया सुळे यांनीही हिंदीच्या सक्तीवर आपला संताप व्यक्त केला आहे. सरकारने एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भविष्य खराब करू नये, असे त्या म्हणाल्यात.

सुप्रिया सुळे नागपुरात पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, हा आमच्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक मुद्दा आहे. हा राजकीय मुद्दा नाही. भाषा शिक्षणाचा मुद्दा अत्यंत



गांभीर्याने घेतला पाहिजे. आपण तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पुढे जायला हवे. इतर कोणतेही राज्य आपल्या जनतेवर अशा प्रकारची सक्ती थोपत नाहीत. मग महाराष्ट्र सरकार एवढा आग्रही पवित्रा का घेत आहे? हे मला समजत नाही.

आपण एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भविष्य खराब करू शकत नाही. आमचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष राज ठाकरे व उद्धव ठाकरे काढत असलेल्या मोर्चात पूर्ण ताकदीने सहभागी होईल. शिक्षण हा आमच्यासाठी अत्यंत गंभीर मुद्दा आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही जोरदार टोला लावला. मी सर्वांना भेटते. त्यात अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांचाही समावेश आहे. भेटीगाठी घेण्यासाठी मी हुडी वगैरे काही घालत नाही. मला ज्यांना भेटायचे आहे त्यांच्याशी दिलखुलास भेटते. फोटो ट्विट करते. आमच्यात काही लपवाछपवी नसते, असे सांगत सुप्रिया सुळे यांनी यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांना जोरदार टोला हाणला.

मला फक्त मुख्यमंत्री फडणवीस भेट देत नाहीत. ही माझी तक्रार आहे. आज ते नागपूरमध्येच असल्याचे

पान ४

# शिवसेना हिंदूहृदय सम्राटांची, टोमणे सम्राटांची नाही:एकनाथ शिंदे

## भंडारावासियांचे आभार मानत उद्धव ठाकरेंवर साधला निशाणा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भंडारा :** सोन्याचा चम्मच तोंडात घेऊन मी जन्माला आलो नसलो, तरी मी जनतेला सोन्याचे दिवस दाखविले आहे. शिवसेना हा मालक-नोकरांचा पक्ष नाही, तर सच्चा शिवसैनिकांचा व कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. हा एकनाथ शिंदे सामान्य कार्यकर्ता आहे. हा पक्ष तुमचा आहे, इथे काही कुणी मालक नाही. राजा का बेटा राजा नहीं बनेगा असे श्रीकांत शिंदेही म्हणाले होते. ही शिवसेना हिंदूहृदय सम्राटांची आहे, टोमणे सम्राटांची नाही. मी सीएम असताना म्हणत होतो की, मी कॉमन मॅन आहे. आता मी डीसीएम आहे. म्हणजेच डेडिकेटेड कॉमन मॅन. वाघाचे कातडे पांघरून वाघ होता येत नाही. घरी बसणाऱ्यांना जनतेने घरीच बसवले आहे. कॉमन

### व्यासपीठ हे वैभव तर कार्यकर्ता हे ऐश्वर्य व संपत्ती

राजकारणात आपला मोठा वारसा आहे, असे सांगणाऱ्यांना महाराष्ट्रातील मायबाप जनतेने आरसा दाखविला आहे. अशा मायबाप जनतेला मी भेटायला आलो असल्याचे ते म्हणाले. कारण मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे. अडीच वर्षांपूर्वी एक शेतकऱ्याचा मुलगा या राज्याचा मुख्यमंत्री झाला, पण मी कार्यकर्ता म्हणून काम केले.



मॅन बनण्यासाठी बाळासाहेब ठाकरेंचेच विचार लागतात. ज्याने बाळासाहेबांचे विचार पायदळी तुडवले त्यांना त्याची प्रचिती आली आहे, असा टोला भंडाऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांना लगावला आहे.

एक बार कमिटमेंट कर दी, तो मै अपनी आप की भी नही सुनता या सिने डॉयलागने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भंडारावासियांचे आभार मानत विरोधकांवर चांगलाच निशाणा साधला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार सभा भंडाऱ्याच्या रेल्वे मैदानात पार पडली. यावेळी ते बोलत होते. भंडारा- पवनी विधानसभा निवडणुकीत आ. नरेंद्र भोंडेकर यांच्या झालेल्या विजयात कार्यकर्त्यांसह

पान ४





# जिल्ह्यातील शाळांमध्ये सीसीटीव्हीची वाणवा

## पालकांमधून नाराजी; सुरक्षा व्यवसाय करण्यासाठी पुढाकार घ्यावा

**महेश रक्ताटे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळांमध्ये सीसीटीव्ही असणे गरजेचे आहे. जिल्ह्यात आजही अनेक शाळांमध्ये सीसटीव्ही नाहीत. त्यामुळे तेथील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. तसेच शाळांमध्ये शिक्षकही शाळेच्या वेळेत बाहेर जात असल्याने अनुचित घटना याच काळात शाळांमध्ये घडत आहे. त्यामुळे प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही असणे आवश्यक आहे.शाळांमध्ये सीटीटीव्ही असण्याचे काही फायदे तसेच तोटेही आहेत.

परंतु एखादी अनुचित घटना घडण्यापासून सीसीटीव्हीमुळे थांबविण्यात शाळा व्यवस्थापनाला यश येऊ शकते. त्यामुळे सीसीटीव्ही असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटव्ही महत्वाची बाब आहे. शाळा ही मुलांची दुसरी घर असते. सीसीटीव्हीमुळे परिसरावर लक्ष ठेवता येते व



**शिक्षण विभागातील गोंधळ (भाग-७)**

### त्या घटनेचे राजकारण नको

शहरातील एका शाळेत दहावीच्या विद्यार्थ्याची विद्यार्थ्याकडून हत्या झालेली आहे. ही घटना कशामुळे घडली. त्याचा तपास पोलिस करीत आहेत. मात्र काहीजण या घटनेचे राजकारण करू पहात आहे. त्या वेळेस शाळेत काय झाले काय नाही, याची माहिती शाळेपासून अनेक किलोमीटर लांब असलेले लोक समाज माध्यमावर मांडत आहे. ही त्यांची भूमिका चुकीची आहे. पोलिसांचा तपास योग्य पध्दतीने सुरु असताना काहीजण जाणूनबुजून आपल्याला खूप काही वाईट वाटले व आपल्याला तेथील सर्वाधिक माहिती आहे, असा आव आणून स्वतःची टिमकी मिरवून घेत आहे. अशांचाही पोलिसांनी शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

संशयास्पद हालचाली लगेच ओळखता येतात. शिस्त आणि वर्तणूक सुधारते मदत होते.

विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचारी वर्तनाबाबत अधिक जागरूक राहतात कारण त्यांना माहिती असते की त्यांच्यावर नजर आहे.शाळेतील घटना नोंदवता येतात.

भांडण, चोरी, गैरप्रकार किंवा अपघात घडल्यास त्याचे व्हिडिओ पुरावे म्हणून वापरता येतात. पालकांचा विश्वास वाढतो. पालकांना खात्री वाटते की त्यांची मुले सुरक्षित आहेत आणि शाळा जबाबदार आहे.

### शाळेच्या वेळेत बाहेर जाणाऱ्यांना लगाम लागणार

शाळेच्या वेळेत बाहेर जाणाऱ्या शिक्षकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे अशा शिक्षकांना लगाम लागू शकतो. माध्यमिक शाळांना नव्हे तर संपूर्ण मराठी व इंग्रजी तसेच सर्वच शाळांनी सीसीटीव्ही बसविवावे. त्यामुळे शाळेच्या वेळेत बाहेर जाणार्यांना लगाम बसू शकतो.

### कोणाचा बळी देऊ नका

विद्यार्थ्याकडून विद्यार्थ्याचा झालेल्या खून प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे कोणाच्या सांगण्यावरून व कोणाच्या तक्रारीवर शिक्षकांवर कारवाई करणे चुकीचे आहे. या प्रकरणाचा सखोल तपास झाल्यानंतर दोषी कोण आहे हे ठरवावे, अशी अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे.

शिक्षकांवर देखरेखही राहते. शिक्षकांचा अध्यापन दर्जा व वर्गातील वागणूक यावर नियंत्रण ठेवता येते. सीसीटीव्हीचे जसे फायदे आहेत. तसे तोटेही आहे. गोपनीयतेचा प्रश्न निर्माण होतो. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गोपनीयतेवर परिणाम होऊ शकतो. कॅमेरे योग्य जागी व मर्यादित वापरले पाहिजेत. खर्चिक असू शकते.

चांगल्या प्रतीचे कॅमेरे, स्टोरेज, देखभाल यासाठी भरीव खर्च करावा लागतो. अतिनियंत्रणाची भीती राहते. विद्यार्थ्यांवर सतत लक्ष ठेवण्याने त्यांच्या मनावर दडपण येऊ शकते.(क्रमशः)

**उद्याच्या अंकात वाचा : शाळांना मैदानेच नाही**

# बदनामी करणाऱ्या युट्युब, इंस्टाग्रामवर कारवाई करा

## छोटा पुढारी घनश्याम दरोडे यांनी दिला आत्मदहनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** जाणीवपूर्वक बदनामी करणाऱ्या युट्युब चॅनल व इंस्टाग्राम आयडीवर त्वरीत कारवाई करा नाहीतर मला



आत्मदहन करण्यास परवानगी द्या, अशा आशयाचे निवेदन छोटा पुढारी घनश्याम दरोडे यांनी पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांना दिले आहे.

घनश्याम दरोडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, सगळी गाणी वाजणार (मालक ओंकार बल्लाळ सांगली) व आरजे सोहम या दोन युट्युब चॅनेलने जाणीवपूर्वक बदनामीचे व्हिडीओ टाकुन बदनामी केली आहे. या बदनामीकारक व्हिडिओमुळे माझे कार्यक्रमाचे सर्व बुकिंग रद्द झाल्याने माझे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. व्हिडीओ मधील बदनामीमुळे समाजात सुद्धा मोठी बदनामी झाली आहे.या दोन्ही व्यक्तीवर त्वरित कारवाई करत हे दोन्ही चॅनेल बंद करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली असून या चॅनलने मला १० लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून द्यावी. या दोन्ही चॅनल व बदनामी करणाऱ्या इंस्टाग्राम अकाउंट बंद करावे.

### आत्मदहन करणार : दराडे

येत्या चार दिवसांत कारवाई करुन त्यांचे अकाउंट बंद करावे, अन्यथा मला आत्मदहन करण्यास परवानगी द्या. तसे न झाल्यास पोलीस स्टेशन कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा घनश्याम दरोडे यांनी दिला आहे.

# निघोज नगरीच्या वैभवात पडणार भर

## निघोजला साकारतंय ४ हजार चौरस फूट क्षेत्रफळ असलेले श्री वर्धमान जैन स्थानक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील निघोज मध्ये तालुक्यातील सर्वांत मोठे श्री वर्धमान जैन स्थानक लोकसहभाग व लोकवर्गणीतून साकारत असून निघोज नगरीच्या वैभवात मोठी भर पडणार आहे.

निघोज येथील जैन बांधवांनी सुमारे ६० वर्षापूर्वी बांधलेले जैन स्थानक आता जुने झाल्याने सर्वांच्या एकमताने व एक विचाराने नव्याने या जुन्या जैन स्थानकाच्या जागेवर भव्य स्वरूपात ४ हजार चौरस फूट क्षेत्रफळ असलेले नवीन तीन मजली जैन स्थानक उभारण्याचा निर्णय झाला आहे. त्यासाठी मोठा आर्थिक खर्च अपेक्षित आहे.




श्री वर्धमान जैन प्रार्थना संघ यांच्या माध्यमातून श्री वर्धमान जैन निघोज, वडनेर बांधवांच्या संयुक्त विद्यमाने या स्थानकाचा भूमिपूजन सोहळा राजेश भंडारी, कुंदन साकला, शिरीष कटारिया, मनोज भंडारी, प्रभाकर कवाद, वसंतराव कवाद, सचिन पाटील वराळ, ठकाराम लंके, चंद्रकांत लंके, अमृता रसाळ, सुभाषराव वराळ, सुधामती कवाद, चेतन भळगट, ज्ञानेश्वर वरखडे, उमेश सोनवणे, बबुशा वरखडे, नामदेव थोरात, ड. बाळासाहेब लामखडे, बाळासाहेब ढुमणे, बबनराव ससाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

निघोज सेवा संस्था, ग्रामपंचायत, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे पदाधिकारी, जैन बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा भूमीपूजन सोहळा यशस्वी करण्यासाठी पारनेर तालुका जैन संघाचे उपाध्यक्ष प्रदीप गांधी निघोज संघाचे माजी अध्यक्ष मनोज गांधी, सतीश लोढा, प्रमोद लोढा, विजयकुमार भंडारी, प्रवीण चोपडा, उद्योजक गणेश कटारिया, हरकचंदजी मुनोत यांनी नियोजन केले.

### कार्यक्रम यशस्वीतेसाठी यांचे परिश्रम

श्री वर्धमान जैन प्रार्थना संघ निघोज अध्यक्ष सुदर्शन लोढा, उपाध्यक्ष शुभम गांधी, अमित गांधी, सचिव अक्षय भंडारी, खजिनदार सचिन मुथीयान, सहसचिव विनोद लोढा, विश्वस्त मयूर गुगळे, विपुल फिरोदिया, मनोज लोढा, केतन गांधी, रामलाल गांधी, प्रवीण गांधी, यश लोढा, अमर भंडारी, आनंद मुनोत, ललित गांधी यांनी परिश्रम घेतले.

---

पारनेर तालुकाध्यक्ष राजेश भंडारी यांनी जैन स्थानकाची भव्य जैन स्थानक उभे करण्याचा मानस व्यक्त करत त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचाही शब्द दिल्याने जैन बांधव सुखावले.

# डॉक्टर्स डे निमित्त सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, अहमदनगर येथे डॉक्टर्स डे निमित्त ३० जून ते ६ जुलै विविध आजारांवर मोफत सर्वरोग तपासणी व होमिओपॅथीक उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार याना दिली आहे. सदर शिबीरामध्ये त्वचा विकार- इसब नायटा, पिंपल्स, सोरायसिस, चाई लागणे, खरुज, पांढरे डाग, मस, चामखीळ, कुरुप, केसांच्या समस्या केस गळणे, केसात कोंडा होणे, केस दुभंगणे, कान फुटणे, टॉन्सीलायटीस, मनोविकार या सारख्या विविध आजारांवर तज्ञ होमिओपॅथीक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करुन होमिओपॅथीक उपचार करण्यात येणार आहे.

# ओम चैतन्य गोरक्षनाथ दिंडीचे गडावरून प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाढी दिंडी सोहळाचे प्रस्थान उत्साहात झाले झाले सकाळी गोरक्षनाथाची पूजा अभिषेक मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली नंतर रथाची पूजा भाविकांच्या हस्ते करून दिंडीचे प्रस्थान झाले.



यावेळी सरपंच सौ. कदम, राम महाराज पोते, दिंडीचे अध्यक्ष भाऊसाहेब हरिश्चन्द्रे, सचिव राधाकिसन गांधले, सुभाष फुलारे, संभाजी गडाख, भास्करराव कदम, सीमाजी तांबे, गोरक्षनाथगड देवस्थानचे विश्वस्त जयराम कदम, इंद्रभान कदम, मेगधे गुरु आदींसह वारकरी, नाथभक्त, ग्रामस्थ, भाविक मोठया संख्येनें उपस्थित होते.

दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली आहे. तर दिंडी सोहळा ट्रस्ट कै दादासाहेब जाधव यांनी स्थापन केला आहे. दिंडी सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ५ श्री पूजा व अभिषेक, पहाटे ५ ते ६ आरती व दर्शन दुपारी प्रवचन व रात्री कीर्तन नंतर दिंडी प्रवासात अखंड भजन होणार आहे.

दि. ३० जून रोजी चापडगाव येथे घोड्याचे रिंगण होणार आहे. पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोचणार आहे. द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे.

# कृषिदूत करणार शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन : जोशी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाड येथील कृषीदुतांचे दाढ खुर्द या गावात पुढील तीन महिन्यासाठी वास्तव्यास असणार असुन येथील शेतकऱ्यांना विविध कृषी विषयक मार्गदर्शन करणार असल्याची माहिती सरपंच सतिश जोशी यांनी दिली. या कृषिदुतांचे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

सेवा संस्कार संस्थेच्या अंतर्गत श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाड येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहे. संस्थेचे संस्थापक साहेबराव नवले, प्राचार्य डॉ. अरविंद हारदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम समन्वयक प्रा. निलेश तायडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. पी. सुद्रिक, प्रा. बी. डी. तायडे यांच्या सूचनेनुसार राजगुरू अक्षय, कौस्तुभ रोहकले, अगावणे मयूर,पुंडे विवेक, सातकर साहिल, काळे कृष्णा, भोत अविष्कार हे दाढ खुर्द येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

त्याप्रसंगी सरपंच सतिश कुंडलिक जोशी, ग्रामसेवक संग्राम चांडे, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# १० जुलैपासून साध्वींच्या चातुर्मासास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील शिवाजी रोड जैन स्थानकमध्ये १० जुलैपासून सुरू होणार्या चातुर्मासासाठी दिवाकर सांप्रदायाच्या उपप'वर्तिनी डॉ. पू. श्री. सत्यसाधनाजी आदी ७ साध्वीजींचा चातुर्मास प्रारंभ होणार आहे.



उपप'वर्तनी सत्यसाधनाजी साध्वीजींच्या समवेत त्यांच्या शिष्या पू. अर्हतज्योतिजी, पू. तन्मयदर्शनाजी, पू. हितसाधनाजी, पू. हर्षप्रज्ञाजी, पू. गुरूछायाजी व पू. सौम्यज्योतीजी साध्वींनी चातुर्मासासाठी येत आहेत. साध्वीजींचे वास्तव्य ३० जून पर्यंत बेलापूरगाव येथे असून तेथून पायी विहार करून सकाळी ६.३० वाजता त्याचे श्रीरामपूर नगरीत आगमन होणार आहे.

३० जून रोजी सकाळी ६.३० वाजता वरील साध्वीजींचे स्वागतासाठी सकल जैन समाज व भाविकांनी श्रीरामपूर-बेलापूर रोड, वरील के. के. मोटर्स जवळ उपस्थित रहावे, असे आवाहन श्रावक संघाचे अध्यक्ष रमेश लोढा व विश्वस्तांनी केले आहे.

३० जून रोजी सकाळी ६.३० वा. वरील साध्वीजींच्या स्वागतासाठी सकल जैन समाज व भाविकांनी श्रीरामपूर-बेलापूर रोड वरील के. के. मोटर्स जवळ उपस्थित रहावे, असे आवाहन श्रावक संघाचे अध्यक्ष रमेश लोढा व विश्वस्तांनी केले आहे.

साध्वीजी श्रीरामपूर नगरीमध्ये ३० जून व १ जुलै पर्यंत नितीन तेजपाल पिपाडा यांचे केतकी अपार्टमेंट, फेज १, वॉर्ड नं. ७, मधील निवासस्थानी राहणार असून २ व ३ जुलैला साध्वीजींचे वास्तव्य संजय छाजेड, वॉर्ड नं. ७, सरस्वती कॉलनी जवळ येथे राहणार आहे. सकल जैन समाजाने पिपाडा व छाजेड यांचे निवासस्थानी दर्शन व प्रवचनाचा लाभ असे आवाहन श्रावक संघाचे अध्यक्ष रमेश लोढा व विश्वस्त नितीन पिपाडा व संजय छाजेड यांनी केले आहे.

# डॉ. दीपक हरके यांना शांतीदूत रत्न पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शांतीदूत परिवाराचा ६ वा वर्धापनदिन रक्तदान शिबीर, अवयवदान, ध्यान शिबीर अशा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शांतीदूत रत्न २०२५ ने गौरव करण्यात आला.

# अखंड मराठा समाजाचे कार्य कौतुकास्पद

## ॲड. बाळासाहेब आगे; श्रीरामपुरात अखंड मराठा समाजाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** अखंड मराठा समाज श्रीरामपूरच्यावतीने मराठा आरक्षणाबरोबरच विविध सामाजिक, धार्मिक व विधायक उपक्रम राबविले जात असून त्याची नितांत गरज आहे. सर्व समाजातील बांधवांना बरोबर घेऊन अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे ॲड. बाळासाहेब आगे यांनी म्हटले आहे.

अखंड मराठा समाज श्रीरामपूरची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. यावेळी ड. आगे बोलत होते. श्रीरामपूर शहरात मराठा आरक्षणाकरिता मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा, आमरण उपोषण, चक्री उपोषण, विविध आंदोलने राबविण्यात आलेले आहेत.

त्याचबरोबर नुकताच जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंतांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.

या समारंभात मराठा समाजाबरोबरच इतरही समाजातील गुणवंतांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केल्याने अखंड मराठा समाजाच्या नावलौकिकात आणखी भर पडली असल्याचे ते म्हणाले.

यावेळी नागेशभाई सावंत यांनी आभार मानले. याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक पंडितराव बोंबले, अण्णासाहेब डावखर, सुधा तावडे, बी. जी. गायधने, प्रसाद खरात, प्रथमेश तारडे, यश बनसोड आदी मराठा समाज बांधव उपस्थित होते.

### आजपर्यंत विविध उपक्रम राबवले

अहिल्यानगर येथे एक लाख बांधवांना भोजन, शिवजयंतीची महिला व पुरुषांची पारंपरिक वाद्यांसह भव्य मिरवणूक, संत निवृत्तीनाथ दिंडीच्यावेळी वारकरी बांधवांना १०० किलो साबुदाणा खिचडी वाटप असे विविध उपक्रम आजपर्यंत राबवले गेले आहेत.

# श्री क्षेत्र सिरसगाव दिंडीचे भक्तीमय वातावरणात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** माउली... माउली... नामाचा जयघोष... तर टाळ मृदंगाच्या गजरात रेल्वेस्टेशन येथील आनंदनगर परिसरात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील श्री क्षेत्र सिरसगाव येथील दिंडीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. दिंडीच्या आगमनाने संपूर्ण रेल्वेस्टेशन परिसर भक्तीमय बनला होता.



दिंडीच्या स्वागतासाठी परिसरातील घरांसमोर सडा, रांगोळ्या टाकण्यात आल्या होत्या. दिंडीचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करीत पुंडलीक वरदा हरी विठ्ठल... श्री ज्ञानदेव तुकारामचा गजर करण्यात आला. दिंडीत पांढऱ्या पोशाखात भगवे ध्वज घेऊन सहभागी असलेले वारकरी, तर महिलांच्या डोक्यावर असलेल्या तुळशी वृंदावन अशा शिस्तबध्द संचलन करणाऱ्या दिंडीने नागरिकांचे लक्ष वेधले. या दिंडीत स्थानिक नागरिक, महिला व वारकऱ्यांमध्ये फुगड्यांचे फेर रंगले होते. ॲड. राजेश कावरे व संगीता कावरे यांनी हभप संजय महाराज निंबाळकर, वीणेकरी चांगदेव महाराज भवर यांचे औक्षण करुन सत्कार केला. यावेळी रेल्वेस्टेशन, आनंदनगर परिसरातील महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिकारे पिता-पुत्राच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

## वीजतारांना चिटकून बसला होता पिता-पुत्रांना शॉक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** शेतामध्ये काम करीत असताना तुटलेल्या तारांना स्पर्श होऊन काकासाहेब शिकारे व महेश शिकारे या दोघांच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा अखेर वायरमन शितल हलगुंडे याच्यावर खर्डा पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला आहे.




याबाबत माहिती अशी की,दिनांक २३ जून २०२५ रोजी काकासाहेब शिकारे वय ४४ वर्ष व त्यांचा मुलगा महेश शिकारे वय १५ वर्षे हे दोघे बापलेक शेतामध्ये खते टाकत असताना तुटलेला वीजतारांना चिटकून शॉक बसल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.या भागातील ड्युटीवर असलेले वायरमन शितल मधुकर हलगुंडे यांनी बाळगव्हाण शिवारातील विजेच्या इलेक्ट्रिक तारा तुटल्याने वीज कनेक्शन बंद न केल्यास कोणाचाही जीव जाऊ शकतो हे माहीत असताना सुद्धा व सदरच्या तुटलेल्या तारा त्यांना सांगूनही त्यांनी काही एक दुरुस्ती केली नाही तारा मधील करंट बंद केला नाही. कामात हलगर्जी पणा केल्यामुळे सदरच्या तुटलेल्या तारांना शिकारे पिता, पुत्रांचा मृत्यूस कारणीभूत असल्याचा सदोष मनुष्यवादाचा गुन्हा गुन्हा इंद्रराज सदाशिव शिकारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रजिस्टर गुन्हा पोलीस ठाणे अंमलदार एस.जी. धामणे यांनी दाखल करून घेतला आहे.

याबाबत पुढील तपास खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत हे करीत आहेत.

# आराध्य सचिन जगताप करतोय पायी वारी

## जगतापांकडून दिंडीची परंपरा कायम । 'भैरवनाथ' दिंडी पंढरपूरकडे रवाना



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** 'जय हरी विठ्ठल' चा नामघोष करत वारकऱ्यांच्या भक्तिमय वातावरणात श्री भैरवनाथ महाराजांच्या पायी दिंडीने काल २८ जून रोजी बनपिंपरीवरून पंढरपूरकडे प्रस्थान केले आहे.

या पालखी सोहळ्यामध्ये बनपिंपरी गावासह आसपासच्या परिसरातील वारकरी भाविक सामील झाले असून वारीची वर्षानुवर्षांची परंपरा यावर्षी देखील तितक्याच प्रसन्न वातावरणात पुढे जाताना दिसत आहेत.

माजी आ. स्वर्गीय अरुण काका जगताप यांची चौथी पिढी या पायी दिंडीमध्ये सहभागी झाली असून जिल्हा परिषदचे माजी सदस्य आणि गुणे आयुर्वेदिक कॉलेजचे अध्यक्ष सचिन जगताप यांचे चिरंजीव आराध्य सचिन जगताप हा सलग तिसऱ्या वर्षी पायी दिंडीमध्ये सहभागी झाला आहे. स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या आधीच्या पिढीपासूनच दिंडीची परंपरा सुरू होती.

बनपिंपरीवरून काल ही दिंडी सकाळी पंढरपूरकडे रवाना झाली प्राध्यापक माणिक विधाते यांनी या दिंडीला शुभेच्छा दिल्या तर नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत दिंडीचे प्रस्थान करण्यात आले. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, मयूर कुलथे अंकुश मोहिते, समीर भिंगरदिवे, सिद्धार्थ आढाव, मनेश साठे, संतोष ढाकणे,खैरे, निखिल लुने, योगेश दाणी आदीसह बनपिंपरी पंचक्रोशितील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चौथ्या पिढीनेही सुरू ठेवली दिंडीचे परंपरा

जगताप यांच्या चौथ्या पिढीनेही सुरु ठेवली असून वयाच्या दहाव्या वर्षीपासूनच आराध्य हा पायी दिंडीमध्ये सहभागी झाला होता. यावर्षी त्याचे तिसरे वर्ष असून हातात भगवा झेंडा, डोक्यावर वारकऱ्यांची टोपी आणि विठू नामाचे गजर करत पाई पाई आराध्य इतर वारकऱ्यांसह दिंडीमध्ये सहभागी होऊन पंढरपूरकडे रवाना झाला आहे.

# महानगरपालिकेतर्फे ‘डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियान’

## वसाहतींच्या परिसरातील पाणी साठ्याची तपासणी, नागरिकांशी संवाद साधत केले मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आलेल्या डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या तिसऱ्या आठवड्यात कोठला परिसरात कोंड्यामामा चौक परिसरात भेटी देऊन तपासणी करण्यात आली. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत परिसरातील वसाहतींमध्ये असलेले पाणीसाठे, टाक्या, हौद आदींची तपासणी करून त्यात अॅबेट टाकण्यात आले. डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती टाळण्यासाठी, प्रजनन साखळी तोडण्यासाठी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी यावेळी केले.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत हे अभियान राबविण्यात आले. यावेळी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. सतीश राजूरकर, आरोग्य केंद्राचे अधिकारी, कर्मचारी, नर्सेस, तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. नागरी वसाहतीमध्ये पाण्याचे साठे तपासून त्यात औषध टाकण्यात आले. तसेच, पावसामुळे वसाहतीच्या परिसरातील टायर, इतर पडीक व टाकाऊ साहित्यांमध्ये साचलेले पाणी काढून स्वच्छ करण्यात आले. डेंग्यू मुक्त अहिल्यानगरसाठी नागिरकांनी स्वतःहून अभियानात सहभाग घ्यावा. स्वतःच्या घराची तपासणी करावी. त्यात घरातील स्वच्छ पाणी साठविलेला हौद, बॅरल, छतावरील पाण्याची टाकी, अडगळीत पडलेले साहित्य व त्यात पावसाचे पाणी साठले आहे का याची तपासणी करावी. घरातील कूलर, तसेच जुन्या पध्दतीच्या फ्रिजमधील ट्रे तपासावा. त्यात डासाच्या अळ्या आहेत का, हे तपासावे. असल्यास ते रिकामे करावे. आपण स्वतःहून सहभाग घेऊन केलेल्या कामाचा, उपाययोजनेचा व्हिडिओ, फोटो महानगरपालिकेत सादर करावा. जे नागरिक सातत्याने स्वतः च्या घरापासून स्वतः सुरवात करतील व इतरांना करण्यासाठी प्रवृत्त करतील, त्यांचा मनपामार्फत सन्मान करण्यात येईल, असेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

### ५ महिने अभियान राबवणार

हे अभियान ५ महिने राबविण्यात येणार आहे. पुढील आठवड्यात ५ जुलै रोजी सकाळी ८ वाजता डेंग्यू मुक्त मोहिमेच्या चौथ्या आठवड्याचे अभियान हनुमान मंदिर भोसले आखाडा या परिसरात पार पडणार आहे. स्थानिक नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



# वडुले खुर्द ते चव्हाणवाडी रस्त्यासाठी निधी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**भातकुडगाव फाटा** : शेवगाव तालुक्यातील मौजे वडूले खुर्द ते चव्हाणवाडी रस्त्यासाठी दहा लक्ष निधी मंजूर झाल्याची माहिती गावच्या लोकनियुक्त सरपंच मीराबाई भाऊसाहेब आव्हाड यांनी दिली. गावचे ज्येष्ठ नागरिक नवनाथ सोनवणे व तान्हाजी गिरजु पांढरे यांच्या हस्ते या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

भाऊसाहेब प्रल्हाद आव्हाड म्हणाले की, रस्ते हे गावच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. येथील शेतकऱ्यांची व गावकऱ्यांची अनेक दिवसांची मागणी होती. आज ही मागणी पूर्णत्वास जाताना अत्यंत आनंद होत आहे. तसेच उर्वरित रस्ता ही लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करू असे आश्वासनही यावेळी त्यांनी दिले. हा रस्ता जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या निधीतून मंजूर करण्यात आला असून आनंद इले. सिव्हिल मजूर सहकारी संस्था मर्यादित यांना हे काम देण्यात आले आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य तात्याबा तुतारे, विष्णुदास आव्हाड कानिफनाथ आव्हाड, रामदास पांढरे, शासकीय ठेकेदार आशुतोष लांडे,मल्हारी आव्हाड सर, आजिनाथ सोनवणे देविदास सोनवणे, वायभासे, महेश पालवे, चेअरमन अमोल आव्हाड, सुनील खेडकर, पाटीलबा पांढरे, गोकुळ नागरे यांच्यासह ग्रामस्थ युवक मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. रस्ता मंजूर केल्याबद्दल ग्राम स्थांनी सरपंच उपसरपंच व ग्राम पंचायत सदस्य यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्हारी आव्हाड यांनी केले तर आभार रामदास पांढरे यांनी मानले.

# कोल्हार येथे वाहतुकीची झाली कोंडी

## नागरिकांमध्ये संताप; मार्ग काढण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोल्हार** : नगर-मनगाड रस्त्यावरील कोल्हार येथे नेहमीच वाहतुकीची कोंडी होत आहे. काल शनिवारी सकाळी अशीच कोंडी निर्माण झाल्याने महामार्गाच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या.

महिन्यातून किमान दोन ते तीन वेळा असा प्रसंग कोल्हार करांना पहावयास मिळतो. यामुळे महामार्गावरील प्रवासीच नाही तर कोल्हार येथील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, नोकर वर्ग, व्यापारी यांना मोठ्या प्रमाणात याचा सामना करणे नित्यनेमाचे झाले आहे. कित्येक वेळा या समस्येवर वेगवेगळ्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर देखील यावर कोणत्याच स्तरातून प्रत्यक्ष कारवाई होताना दिसत नाही. पोलीस प्रशासन देखील वारंवार उपाययोजना करून देखील हतबल असल्याचे पहावयास मिळते. अखेर वारंवार उद्भवणाऱ्या समस्येतुन मार्ग काढणारा कोणी वाली आहे की नाही असा सवाल सर्व नागरिकांकडून केला जात आहे.

शिर्डी व शनिशिंगणापूर यांना जोडणाऱ्या महामार्गावर वसलेलं हे शहर आहे. खास करून गुरुवार शनिवार रविवार या दिवशी भाविक मोठ्या प्रमाणात येथे दर्शनासाठी येजा करीत असतात. तसेच कोल्हार हे देखील महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील एकमेव साडेतीन शक्तीपीठ एकत्र असलेल्या तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

शिर्डी तसेच शनिशिंगणापूर ला येणारे भाविक हे भगवती मातेच्या दर्शनासाठी आवर्जून थांबतात. यांची देखील यामुळे मोठ्या प्रमाणात गैरसोय होते.

# आ. खताळ यांच्यावर खोटी टीका

## गुंजाळ मळा परिसरातील कार्यकर्त्यांचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : संगमनेर तालुक्याचे लोकप्रतिनिधी या नात्याने तालुक्यात सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी करून या कामांना गती देण्याचे काम आमदार अमोल खताळ हे करत आहे. शहरातील पंचायत समिती जवळील गुंजाळ नगर परिसरात सुरू असलेल्या ट्रक टर्मिनलचे काम रखडल्याने त्यांनी या कामाची पाहणी करून ट्रक टर्मिनलचे काम लवकर पूर्ण करावे, अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

या कामाच्या श्रेय घेण्याबाबत त्यांनी कुठलेही वक्तव्य केले नाही. आमदार खताळ हे झपाट्याने तालुक्यातील विकास कामांकडे लक्ष देत असल्याने विचलित झालेल्या नेत्याने आपल्या कार्यकर्त्यांना पुढे करून आमदार खताळ यांच्यावर खोटी टीका केली आहे, असा आरोप या परिसरातील कार्यकर्त्यांनी केली आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे की, संगमनेर शहरातील पंचायत समिती जवळ केंद्र सरकारच्या आर्थिक मदतीमधून संगमनेर नगर परिषदेच्या माध्यमातून ट्रक टर्मिनलचे काम सुरू आहे. मागील वर्षी या कामाला मंजुरी मिळाली होती. या कामासाठी जवळपास सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. गेल्या काही महिन्यापासून या टर्मिनल चे काम सुरू आहे. या कामाची गती अतिशय कमी असल्याने आमदार खताळ यांनी या ठिकाणी येऊन ट्रक टर्मिनल च्या कामाची पाहणी केली त्यांच्या समवेत संगमनेर नगर परिषदेचे मुख्याधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.

### ‘अमृतवाहिनी’त मार्गदर्शन केंद्र सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पालक व विद्यार्थ्यांची प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या प्रवेशाची प्रतीक्षा संपली असून नुकतेच तंत्रशिक्षण संचालनालयाने सर्व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यांचे वेळापत्रक जाहीर केले आहेत. दिनांक २८ जून २०२५ पासून प्रथम वर्ष अभियांत्रिकी आणि एमबीए प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहेत. याकरिता यापूर्वीच अमृतवाहिनी महाविद्यालयाने मार्गदर्शन केंद्र सुरू करून आत्तापर्यंत एक हजाराच्या वर विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन प्राध्यापकाकडून समुपदेशनाद्वारे विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे समाधान करण्यात आले आहे. महाविद्यालयाने सोशल मीडियाद्वारे सर्व महत्त्वाचे संदेश पालकांपर्यंत पोहोचवण्याची यशस्वी यंत्रणा राबवली आहे.

# खा. लंकेंकडून मिळणार वारकऱ्यांना वडापाव

## कुरकुरीत भजे, चहा, बिस्किट, बाटलीबंद पाण्याचेही नियोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पंढरीच्या पांडूरंगाच्या दर्शनासाठी दिंडीने निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा सेवाभावी संघटनेच्या वतीने २ ते ४ जुलै दरम्यान टेंभुर्णी ते पंढरपुर मार्गावर परिते, तालुका माढा येथे दोन लाख गरमागरम वडापावसह कुरकुरीत भजी, चहा, बिस्किट व बाटलीबंद पाण्याचे वितरण करण्यात येत आहे.

गेल्या काही वर्षांपासून खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून वारकऱ्यांच्या सेवेसाठी नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. लंके प्रतिष्ठानच्या आरोग्य विभागाकडून वारकऱ्यांना मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. खा. लंके यांच्या सुचनेनुसार पारनेर बाजार समितीच्या वतीने वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण करण्यासाठी रेनकोटचे वाटप करण्यात आले.

अल्पोपहार वितरणासाठी परिते येथे मंडप उभारणीच्या कामाची तयारी सुरू असून या अल्पोपहारासाठी विविध दानशुरांनी देणगी तसेच वस्तूच्या स्वरूपात योगदान दिले आहे. खा. नीलेश लंके यांनी या तयारीचा आढावा घेउन नियोजनात काही त्रुटी आहे का याची माहीती घेतली. दरम्यान २ ते ४ जुलै दरम्यान खा. लंके हे परिते येथे उपस्थित राहून वारकऱ्यांची सेवा करणार आहेत.

### २ लाख पाणी बॉटल

परिते येथे या वितरणासाठी खास पत्र्याचे छत असेलल्या मंडपाची उभारणी करण्यात आली असून तिथे ८ भक्ष्यांद्वारे चहा, गरम बटाटा वडे, कांदा भजी तयार करण्यात येणार आहेत. त्यासाठी २५ आचारी तैनात ठेवण्यात येणार आहेत. तर खा. नीलेश लंके यांचे ५०० स्वयंसेवक अल्पोपहार वितरीत करण्यासाठी हजर असतील. २ लाख पाणी बॉटल तसेच २ लाख पावांचेही तीन दिवसांसाठी नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, स्वयंसेवकांसाठी भोजनाचीही व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे.



# राहुरीतून १ किलो गांजा हस्तगत

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहुरी खुर्द** : राहुरी शहरातून दोघांकडून पोलिसांनी ९५० ग्रॅम गांजा हस्तगत केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, राहुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना गुप्त माहिती कळाली काही जण राहुरीत अग्नीशस्त्र घेऊन येणार आहेत. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक समाधान पडवळ व राहुरी पोलीस स्टेशन कडील डीबी पथकातील अंमलदार यांना नाकाबंदी बाबत सूचना देऊन रवाना केले असता पोलिसांनी गोपनीय माहितीप्रमाणे दोन मोटरसायकलवर आलेले दोन इसम ओंकार सुकदेव साळवे (वय १९, रा. राहुरी जिल्हा अहिल्यानगर) व त्याचे सोबत राहुरी येथील एक अल्पवयीन मुलगा अशांना पकडले. परंतु त्यांच्याकडे अग्निशास्त्राच्या ऐवजी ९५० ग्राम गांजा मिळून आला. त्यामुळे त्यांची पंच व नायब तहसीलदार बाचकर यांच्या समक्ष झडती घेऊन राहुरी पोलिस ठाण्यात येथे गुन्हा रजिस्टर नंबर एनडीपीएस कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस उपनिरीक्षक समाधान पडोळ, पोलीस हवालदार सुरज गायकवाड,पोलिस हवालदार राहुल यादव, पोलिस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे, पोलिस कॉन्स्टेबल सतीश कुऱ्हाडे, पोलीस कॉन्स्टेबल अंकुश भोसले तसेच मोबाईल सेल उत्तर विभाग येथील पोलिस हवालदार संतोष दरेकर, सचिन धनाड, पोलिस कॉन्स्टेबल रामेश्वर वेताळ यांच्या पथकाने केली.

# पारनेर तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर** : पारनेर तालुक्यातील मुळा नदी पात्रातील देसवडे येथून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी रात्री पळसपूर गावच्या शिवारात कारवाई केली. या प्रकरणी चालक-मालकांवर गुन्हा दाखल करत २० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, रणजित जाधव, रमीजराजा आत्तार व भगवान थोरात यांनी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत डंपरचालक राहुल कुंडलिक भाईक (वय ३३, रा. कातळवेढा, ता. पारनेर) याला ताब्यात घेण्यात आले आहे. मालक उल्हास भाऊसाहेब दरेकर (रा. देसवडे, ता. पारनेर) हा फरार आहे. पारनेर तालुक्यातील पळसपूर गावच्या शिवारात महावितरण कंपनीच्या सब स्टेशनजवळ सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत डंपर व वाळू असा २० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे जोरदार स्वागत

## दोन संतांच्या भेटीचा अनोखा सोहळा उत्साहात साजरा झाला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीचे कर्जत मध्ये अतिशय भव्य दिव्य आणि जोरदार स्वागत ग्राम स्थांच्या वतीने करण्यात आले. यानिमित्ताने कर्जत शहरात भक्ती सागराच्या लाटा उसळल्या होत्या. संत निवृत्तीनाथ व संत गोदड महाराज यांच्या गजराने कर्जत शहर दुमदुमून गेले होते. संत निवृत्तीनाथ महाराज व संत मीराबाई यांच्या वंशामधील संत शिरोमणी सद्गुरु गोदड महाराज या दोन संतांची भेट या निमित्ताने झाल्याने हा अनोखा सोहळा मोठ्या भक्ती पूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाला.

संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे आगमन होताच विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे व नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी संत निवृत्तीनाथांच्या चरणी नतमस्तक होऊन स्वागत केले. यावेळी प्रशासकीय अधिकारी देखील मोठ्या संख्येने व ग्रामस्थ नागरिक उपस्थित होते.



पालखी मधील वारकऱ्यांना घरी जेवणासाठी घेऊन जाण्याची आगळीवेगळी परंपरा कर्जत करांनी शेकडो वर्षांपासून जपली आहे. याशिवाय ठिकठिकाणी या वारकऱ्यांना महाप्रसाद याची देखील आयोजन करण्यात येते. पालखीच्या दर्शनासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये भाविकांची गर्दी झाली होती. याशिवाय ठीक ठिकाणी चहा, खाण्यासाठी नाष्टा, मोफत औषधे, इतर वैद्यकीय सेवा देण्यात आल्या.

### डी.आर. फाउंडेशनचा पुढाकार

वारकऱ्यांच्या सेवेसाठी अनोखे उपक्रम आमदार रोहित पवार मित्र मंडळ व संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी आमदार रोहित पवार मित्र मंडळ आणि डी. आर. फाउंडेशन यांच्या वतीने माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत यांच्या नेतृत्वाखाली राज्यात आदर्श ठरावेत असे विविध अनोखे उपक्रम राबवण्यात आले. वारकऱ्यांच्या सेवेच्या भावनेतून प्रेरित होत, पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी मोफत दाढी कटिंग व चप्पल दुरुस्ती या आगळ्यावेगळ्या सेवा देण्यात आल्या.

### जगन्नाथ रथयात्रेत आ. खताळांचा सहभाग



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : शहरातील राजस्थानी ब्राह्मण समाज आणि जगदीश मंदिर ट्रस्टच्यावतीने भगवान जगन्नाथ रथयात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये निघालेल्या या शोभायात्रेने संपूर्ण शहरात धार्मिक उत्साह व एकात्मतेचे वातावरण निर्माण केले. या शोभायात्रेमध्ये प्रथमच आ. अमोल खताळ यांनी लोकप्रतिनिधी म्हणून सक्रिय सहभागी होत भगवान जगन्नाथाची पूजा-आरती करून कृपाशीर्वाद घेतला.

संगमनेर शहरातील कॅप्टन लक्ष्मी चौक येथील विठ्ठल मंदिराजवळ असलेल्या भगवान जगन्नाथ मंदिरापासून या शोभा यात्रेला शुभारंभ झाला. ही शोभायात्रा बाजारपेठ, नगरपालिका मेनरोड मार्गे ही यात्रा बालाजी मंदिर ते श्रीकृष्ण मंदिरा पर्यंत नेण्यात आली. श्रीकृष्ण मंदिर येथे आमदार अमोल खताळ यांच्या वतीने स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. येथे त्यांनी रथाचे स्वागत करत समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय

## दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पाक

पाकिस्तानच्या अर्थसंकल्पाचा सुमारे अर्धा भाग केवळ कर्ज फेडण्यातच जात आहे. गरिबी कमी करणे, शिक्षण आणि आरोग्य सुधारणांवर खर्च करणे हे तिथे प्राधान्य नाही; परंतु संरक्षण बजेटमध्ये सुमारे २० टक्के वाढ करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पानंतर, एकीकडे कर्जामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था बिकट होईल, तर दुसरीकडे भारताने लादलेल्या निर्बंधांमुळे त्याच्या आर्थिक अडचणी आणखी वाढतील, असे चित्र आहे. पाकिस्तानवर एकूण ७६ हजार अब्ज रुपयांचे कर्ज आहे. पाकिस्तानच्या नवीन अर्थसंकल्पापूर्वी सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणातून त्याची दयनीय स्थिती अधोरेखित होत असल्याचे दिसून येते हे उल्लेखनीय आहे. पाकिस्तानचा परकीय चलन साठा फक्त १६.६४ अब्ज डॉलर आहे. एवढेच नाही, तर आजकाल पाकिस्तानची बिकट आर्थिक स्थिती पाहता तो एकामागून एक नवीन परदेशी कर्जे घेताना दिसत आहे. त्याचे कर्ज आणि जीडीपी यांच्यातील प्रमाण सुमारे ६५ टक्के आहे. हे कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक मानले जाते. आर्थिक सर्वेक्षणानुसार, इतके जास्त कर्ज आणि त्याचे अयोग्य व्यवस्थापन पाकिस्तानच्या आर्थिक आणि राजकोषीय स्थिरतेसाठी एक मोठा धोका बनला आहे. हेदेखील लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की पाकिस्तान सध्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जावर अवलंबून आहे. 'आयएमएफ'च्या अलीकडील अहवालानुसार, आर्थिक अस्थिरता, महागाई आणि खराब परकीय कर्ज परिस्थिती यासारख्या घटकांचा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने त्याला एक अब्ज डॉलर्सचे कर्ज दिले आहे; पण यासोबतच पाकिस्तानवर ११ नवीन अटीही लादल्या. आता 'आयएमएफ'च्या एकूण अटींची संख्या ५० वर पोहोचली आहे. त्यात सात अब्ज डॉलर्सच्या कर्जाच्या बदल्यात लादण्यात आल्या आहेत. 'आयएमएफ'च्या मते, चालू वर्षात पाकिस्तानचा बेरोजगारीचा दर ८.५ टक्के आहे. त्याचबरोबर गरिबीही वाढत आहे. पहलगाम हल्ल्यानंतर पुढे ढकलण्यात आलेल्या सिंधू पाणी करारामुळे काही दिवसांत पाकिस्तानमध्ये अस्वस्थता वाढली आहे. एवढेच नाही, तर भारताने चिनाब नदीवरील बगलिहार बॅरेजमधून पाण्याचा प्रवाह रोखला आहे. याशिवाय, झेलम नदीवर बांधलेल्या किशनगंगा धरणाच्या माध्यमातूनही अशीच पावले उचलण्याची रणनीती आखली जात आहे. अशा परिस्थितीत पाण्याच्या मुद्द्यावर पाकिस्तानी संसदेपासून ते लष्करापर्यंत अस्वस्थता दिसून येत आहे. सिंधू खोरे ही आपली जीवनरेखा आहे. ९० टक्के शेती या पाण्यावर अवलंबून आहे. खरे तर, २० व्या शतकातील युद्ध तेलासाठी होते, तर २१ व्या शतकातील युद्ध पाण्यासाठी असेल. पाकिस्तान सध्या पाण्याची टंचाई असलेल्या देशांमध्ये आघाडीवर आहे. या संदर्भात, जागतिक बँकेचे प्रमुख अजय बंगा यांनी म्हटले आहे, की सिंधू पाणी करारात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेची भूमिका केवळ मध्यस्थीची आहे आणि ती भारताच्या बाजूने कराराच्या निलंबनात हस्तक्षेप करणार नाही. सहा जूनपर्यंत पाकिस्तानने भारताला चार पत्रे लिहून या निर्णयावर पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे. दुसरीकडे, भारताने जल करार स्थगित करण्याच्या निर्णयामागे सीमापार दहशतवादाचे कारण दिले आहे. तसेच पाणी प्रकल्पांबाबत काही तांत्रिक आक्षेप घेण्यात आले आहेत. भारताने पाकिस्तानसोबतच्या सर्व प्रकारच्या व्यापारावर पूर्णपणे बंदी घातली आहे. पाकिस्तानमध्ये उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तूंच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयातीवर बंदी आहे. कर्जबाजारी पाकिस्तानमध्ये महागाई नियंत्रणाबाहेर गेली आहे. भारत पाकिस्तानला 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' (एफटीएफ) च्या ग्रे यादीत पुन्हा आणण्याची तयारी करत आहे हेदेखील महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार पाकिस्तानविरुद्ध कारवाई करण्यास 'एफएटीएफ' ला सांगितले जाईल. 'एफएटीएफ'च्या संभाव्य बैठकीत हा मुद्दा उपस्थित केला जाईल. अशा परिस्थितीत, पाकिस्तानचे वाढते कर्ज आणि आर्थिक आव्हाने त्याची आर्थिक स्थिती आणखी कमकुवत करू शकतात.

पाकिस्तानची अर्थव्यवस्था किती प्रमाणात कोसळली आहे याचा अंदाज यावरून येतो, की ते कर्जासाठी दारोदार भटकत आहे. पाकिस्तानने दुबईला जाऊन मदतीचा हात पुढे केला आणि पाच बँकांकडून १ अब्ज डॉलर्सचे कर्ज घेतले. पाकिस्तानला पाच वर्षांत एक अब्ज डॉलर्सचे कर्ज फ ेडावे लागेल. पाकिस्तानची बिघडणारी स्थिती आता कोणापासूनही लपलेली नाही. त्याची तिजोरी रिकामी असल्याने आता सामान्य खर्चही भागवणे कठीण होत चालले आहे. आपल्या खर्चासाठी तो कधी 'आयएमएफ'कडे भीक मागतो तर कधी जागतिक बँक, आशियाई विकास बँकेकडे पैसे मागतो. पाकिस्तानने पैसे मागण्यासाठी दुबईलाही पोहोचले. जिथे पाच बँकांनी मिळून १ अब्ज डॉलर्स (सुमारे ८.६ हजार कोटी रुपये) कर्ज दिले आहे. पाकिस्तानने पाच वर्षांच्या सिंडिकेटेड टर्म फायनान्सद्वारे एक अब्ज डॉलर्सचे हे कर्ज घेतले आहे आणि त्यावर स्वाक्षरी केली आहे. 'आयएमएफ' आणि 'एमओएसपीआय'च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र आणि तामिळनाडू ही भारतीय राज्ये आता पाकिस्तानपेक्षा मोठी अर्थव्यवस्था बनली आहेत. 'आयएमएफ'च्या आकडेवारीनुसार, पाकिस्तानची अर्थव्यवस्था २.६ टक्क्यांनी वाढली आहे. तिचा जीडीपी ३७३.०५ अब्ज डॉलर आहे. याउलट, भारताचा जीडीपी वेगाने वाढला आहे आणि तो पाकिस्तानच्या जीडीपीपेक्षा १० पट जास्त आहे. २०२५ मध्ये भारताचा जीडीपी वाढ ६.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे आणि सध्याच्या किमतींवर देशाचा जीडीपी ४ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त असेल. महाराष्ट्राचा जीडीपी ४२.६७ लाख कोटी रुपये आहे आणि तामिळनाडूचा जीडीपी ३१.४४ लाख कोटी रुपये आहे. त्याच वेळी, पाकिस्तानचा एकूण जीडीपी ३०.९६ लाख कोटी रुपये आहे. महाराष्ट्र आणि तामिळनाडू ही दोन्ही राज्ये देशातील प्रमुख औद्योगिक आणि ऑटोमोटिव्ह केंद्रे आहेत. मेड इन इंडिया वर लक्ष केंद्रित केल्यामुळे या राज्यांमध्ये जीडीपी वाढीला आणखी चालना मिळाली आहे. आर्थिक आव्हाने असूनही, पाकिस्तान आपल्या राष्ट्रीय संरक्षणावर, अणु क्षमता राखण्यासाठी आणि आपल्या क्षेपणास्त्र प्रणाली वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे. पाकिस्तानने आर्थिक वर्ष २०२५ साठी आपले संरक्षण बजेट १६.४ टक्क्यांनी वाढवून ७.३७ अब्ज डॉलर (६०,६५५ कोटी रुपये) केले आहे.

# मुत्सद्देगिरीतून भारताची चीनवर कुरघोडी

**विश्वभ्रमण**
**– प्रा. जयसिंग यादव**



चीनने भारताच्या शेजारी देशांशी मैत्री करून भारताची सुरक्षा आणि अर्थकारण अडचणीत आणण्याचा सतत प्रयत्न केला. आता भारताने चीनला त्याच्याच भाषेत उत्तर देऊन मंगोलियासोबत संयुक्त लष्करी सराव सुरू केला आहे. मंगोलियाबरोबर भारत संबंध दृढ करत असल्याचे लक्षात येताच अपेक्षेप्रमाणे ड्रॅगनचे पित्त खवळले आहे. या देशाबरोबर संयुक्त लष्करी सराव केल्याने चीन नाराज होण्याचे कारण काय, हे समजून घेतले पाहिजे.

शेजारील देशांद्वारे चीन भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेश, मालदीव आणि पाकिस्तान ही याची ठळक उदाहरणे. भारतानेही चीनला आता त्याच्याच भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. फिलीपिन्सला ब्रह्मोस क्षेपणास्त्र दिल्यानंतर भारताने आता चीनच्या दुखऱ्या नसीवर बोट ठेवले आहे. भारतीय सैन्य चीनच्या मागच्या अंगणात लष्करी सराव करत आहे. मंगोलिया हा देश भारत आणि चीनमधील प्रभावासाठी एक नवी युद्धभूमी म्हणून उदयास येत आहे. चीनने रशियासह मंगोलियाशी त्रिपक्षीय करार करताच भारताने या मध्य आशियाई देशासोबत लष्करी सराव सुरू करुन मंगोलियाशी वेगाने लष्करी संबंध निर्माण करण्यास सुरुवात केली. भारत आणि मंगोलियातील वार्षिक द्विपक्षीय लष्करी सराव अर्थात 'नोमॅडिक एलिफंट २०२५'ची सतरावी आवृत्ती ३१ मे रोजी सुरू झाली, तर याच्या एक दिवस आधी मंगोलियाने चीन आणि रशियासोबत सहकार्य करार केला. मंगोलियन सैन्याने भारतीय सैन्यासोबत संयुक्तपणे लष्करी कवायती सुरू करताच चीन संतापला. चीनने या 'राजनयिक स्वातंत्र्या'विरोधात मंगोलियाला इशारा दिला आहे. एका चीनी माध्यमाने धमकी दिली आहे की भारतासोबतच्या या डावपेचांमुळे रशिया ते चीनपर्यंतच्या 'पॉवर ऑफ सायबेरिया २' पाईपलाईन प्रकल्पाबाबत संशयाचे सावट निर्माण झाले आहे. ही पाईपलाईन मंगोलियातून जाणार आहे. चीनला भीती आहे की मंगोलियाशी चांगले संबंध निर्माण करून भारत मंगोलियातून जाणाऱ्या या पाईपलाईनचा वापर चीनविरुद्ध करू शकेल. ही पाइपलाइन रशियाहून मंगोलियामार्गे चीनमध्ये ५० अब्ज घनमीटर गॅस वाहून नेणार आहे. या प्रकल्पाची किंमत सुमारे १०० अब्ज डॉलर्स आहे.

भारत आणि मंगोलियामधील संरक्षण सहकार्य ही काही नवी बाब नाही. 'नोमॅडिक एलिफंट'सारखे सराव वर्षानुवर्षे सुरू आहेत; परंतु सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीत त्याचे महत्त्व खूप वाढले आहे. हा लष्करी सराव मंगोलियाची राजधानी उलानबातर येथील विशेष दल प्रशिक्षण केंद्रात होत असून त्यात दहशतवादविरोधी सराव, संयुक्त ऑपरेशन्स आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांच्या सिम्युलेशन क्रियाकलापांचा समावेश आहे. भारत मंगोलियाशी केवळ लष्करीच नाही, तर आर्थिक आणि धार्मिक संबंधदेखील मजबूत करत आहे. भारत चीनला बायपास करून मंगोलियातून कोकिंग कोळसा, तांबे आणि दुर्मिळ पृथ्वी घटकांसारखे महत्त्वाचे खनिज थेट रशियामार्गे भारतात आणण्याचा प्रयत्न करत आहे. यासाठी भारताने रशियाकडे 'ट्रान्झिट कॉरिडॉर' म्हणून पाहण्यास सुरुवात केली आहे. चीनमधील दुसऱ्या क्रम ांकाचे सरकारी माध्यम असलेल्या 'चायना न्यूज सर्व्हिस'म ध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखात १८४०-४२ च्या अफू युद्धात गमावलेले प्रदेश परत मिळवण्याच्या चीनच्या प्रतिज्ञेचा उल्लेख करण्यात आला होता. म्हणजेच चीनची नजर मंगोलियावरही आहे आणि भविष्यात तो ते ताब्यात घेऊ शकतो. मंगोलियाला याची भीती आहे. लेखात म्हटले आहे, की मंगोलियाला चीन ऐतिहासिकदृष्ट्या आपला एक भाग मानतो. चीन २०४५ ते २०५० दरम्यान मंगोलिया ताब्यात घेण्यासाठी लष्करी हल्ला करू शकतो. ही चीनच्या त्याच विस्तारवादी धोरणाची झलक आहे, जी दक्षिण चीन समुद्र, तैवान, भारताचा अरुणाचल प्रदेश आणि हिमालयीन सीमांवर दिसत आहे.

२०१६ मध्ये तिबेटी आध्यात्मिक नेते दलाई लामा यांनी मंगोलियाची राजधानी उलानबाटारला भेट दिली, तेव्हा संतप्त चीनने मंगोलियाविरुद्ध अनेक कठोर पावले उचलली. मंगोलिया हा एक भूपरिवेष्ठित देश आहे. त्याच्या कोणत्याही सीमा समुद्राला स्पर्श करत नाहीत. याचा फायदा घेत चीनने मंगोलियासाठी एक अतिशय महत्त्वाचा मार्ग बंद केला. याशिवाय चीन आणि मंगोलियामधील वस्तूंच्या आयात-निर्यातीवर शुल्कदेखील लादले. मंगोलिया त्याच्या गंभीर आर्थिक समस्यांना तोंड देण्यासाठी चीनशी कर्जाच्या वाटाघाटी करत होता; परंतु चीनने कर्जावर चर्चा करण्यासाठी झालेल्या वाटाघाटीदेखील थांबवल्या. मंगोलियाला बीजिंगकडून ४.२ अब्ज डॉलर कर्ज मिळण्याची आशा होती. चीनला मंगोलिया आपल्या छत्राखाली राहावे असे वाटते; परंतु मंगोलिया आता राजनयिक स्वातंत्र्य शोधत आहे. त्यासाठी त्याला भारतासारख्या भागीदारांची गरज महत्वाची वाटते; परंतु मंगोलियाची सर्वात मोठी समस्या म्हणजे चीनवरील त्याचे अत्यंतिक अवलंबित्व. आजही या देशाचे चीनवर सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त आर्थिक अवलंबित्व आहे तर ऊर्जा आणि पायाभूत सुविधांसाठी तो रशियावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याची परिस्थिती कठीण आहे. तिथे त्याला राजनयिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे; परंतु दोन महासत्तांच्या आर्थिक पकडीतून बाहेर पडणे कठीण आहे. दुसरीकडे, उत्तर कोरिया आणि अफगाणिस्तानशी असलेली मंगोलियाची भौगोलिक जवळीक अमेरिकेसाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची ठरते.

मंगोलिया चीन आणि रशियापासून तुटलेला राहू शकत नाही; परंतु भारतासोबतचे त्यांचे धोरणात्मक सहकार्य चीनसाठी चिंतेचा विषय बनल्याचा इशारा चीनने लेखात दिला आहे. भारताचे मंगोलियाशी मजबूत संबंध आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये मंगोलियाला भेट दिली होती. हा एक अतिशय महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय होता. या काळात भारताने मंगोलियाला एक अब्ज डॉलर्सची कर्ज मदत दिली. मोदी यांनी मंगोलियाच्या संसदेत भाषण केले आणि असे करणारे ते पहिले परदेशी नेते बनले. त्यानंतर २०१९ मध्ये भारत आणि मंगोलियाने अंतराळ करारावर स्वाक्षरी केली. याशिवाय २००९ मध्ये भारत आणि मंगोलियामध्ये नागरी अणु करार झाला. भारत-मंगोलिया संयुक्त कार्यगट दर वर्षी बैठका घेतो. आता तर मंगोलिया भारत आणि चीन या दोघांसाठीही धोरणात्मक युद्धाचे केंद्र बनला आहे; परंतु फरक असा आहे, की भारत तेथे भागीदारी आणि आदराचे मॉडेल सादर करत आहे, तर चीन दबाव आणि भीतीचे वातावरण निर्माण करत आहे. मंगोलियाला कोणाचे समर्थन करायचे हे ठरवायचे आहे; परंतु हे स्पष्ट झाले आहे की भारत आता हिमालयापुरता मर्यादित नाही, तर त्याने मंगोलियामध्येही धोरणात्मक उपस्थिती नोंदवली आहे. जगातील अनेक देशांचे सैन्य इतर देशांसोबत लष्करी सराव करत असते. तसेच भारतीय सैन्य इतर देशांसोबत लष्करी सराव करते.

भारतीय लष्कराचे एक पथक अलिकडेच बहुराष्ट्रीय लष्करी सरावात सहभागी होण्यासाठी मंगोलियाला पोहोचले. भारतीय लष्कराच्या या तुकडीत ४० सैनिकांचा समावेश आहे. त्यात प्रामुख्याने कुमाऊँ रेजिमेंटच्या बटालियनचे सैनिक आहेत. खान क्वेस्ट नावाचा हा संयुक्त सराव आहे. मंगोलियाला पोहोचलेल्या भारतीय संघात महिला जवनांचाही समावेश आहे. हा सराव मंगोलियन सशस्त्र दल आणि 'यूएस इंडो-पॅसिफिक कमांड'यांच्या सहकार्याने आयोजित केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता राखण्याच्या मोहिमांसाठी सहभागी देशांच्या सैन्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांना परस्पर समन्वय, ऑपरेशन्स आणि सहकार्यात चांगले बनवणे हे खान क्वेस्ट सरावाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हा सराव जागतिक शांतता राखणे आणि मानवतावादी मदतकार्यासाठी सैनिकांना तयार करतो. भारत दर वर्षी खान क्वेस्ट सरावात आपले सैन्य पाठवतो. भारतीय सैन्याच्या सहभागावरून दिसून येते की भारत जागतिक शांतता राखणे आणि बहुपक्षीय लष्करी सहकार्याला महत्त्व देतो. या सरावामुळे भारतीय सैन्याला विविध देशांच्या सैन्यासोबत जवळून काम करण्याची आणि आंतरराष्ट्रीय लष्करी मानके स्वीकारण्याची संधी मिळते. २०२४ मध्ये भारतीय सैन्याच्या राजपुताना रायफल्स युनिटने या सरावात भाग घेतला होता. पहिल्यांदा २००३ मध्ये अमेरिका आणि मंगोलियन सशस्त्र दलांमधील द्विपक्षीय कार्यक्रम म्हणून हा सराव सुरू झाला. त्यानंतर, २००६ पासून हा सराव बहुराष्ट्रीय शांतता राखण्याच्या सरावात रूपांतरित झाला. यंदा त्याची बाविसावी आवृत्ती आहे. जगातील अनेक देशांचे सैन्य त्यात भाग घेत असताना भारताने घेतलेला भाग चीनला खुपतो आहे.

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ यांच्यावतीने आक्रोश मोर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ यांच्या वतीने आक्रोश मोर्चा.. एसटी बस स्थानकावर आंदोलकांनी घुसून रोखल्या.. तहसील कार्यालयावर धरणे आंदोलन

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ व वृद्ध भूमी शेतमजूर महिला संघटना यांच्या वतीने आज दिनांक २७ रोजी कर्जत येथे आक्रोश मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी कर्जत एसटी बस स्थानकामध्ये घुसून कर्जत व स्थानका च्या परिसराचे कॉंक्रिटीकरण करावे व एसटी डेपो तात्काळ करावा या मागणीसाठी व स्थानकावरील एसटी रोखून धरल्या. यानंतर तहसील कार्यालयावर मोर्चा नेऊन त्या ठिकाणी धरणे आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष शब्बीर भाई पठाण व तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील यांनी केले. या आंदोलनात सरपंच अशोक जायभाय, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे, बाबा भैलुमे, सय्यद भाई काटे माप वाले जयसिंग निंभोरे अरुण नेवसे प्रमोद महामुनी राजू शेख जनाबाई कचरे शोभाताई पवार छाया पडळकर छाया कांबळे हरिभाऊ कोकाटे हनीफाई शेख शेरखान पठाण अंबादास कांबळे रज्जा पठाण छाया कांबळे शाहिदास झारेकरी रंजना साळवे रंजना राऊत दादा वाघमारे पठाण दत्ता तनपुरे यांच्यासह प्रचंड मोठ्या संख्येने महिला व वृद्ध नागरिक सहभागी झाले होते. या आंदोलनाला प्रहार वंचित बहुजन आघाडी यासह विविध संघटनांनी पाठिंबा दिला होता.



कर्जत येथील बाजार तळ येथून या मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चा कर्जत बस स्थानक येथे घुसला. त्यानंतर तहसील कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना शशिकांत पाटील म्हणाले की, कर्जत येथे एसटी डेपो मंजूर आहे. कामही पूर्ण झाले आहे. मात्र एसटी डेपो सुरू करण्यात येत नाही यामुळे वृद्ध नागरिक व महिला यांचे हाल होत आहे . तसेच कर्जत बस स्थानक येथे सिमेंट कॉंक्रीट नसल्यामुळे सर्व मैदानावर मोठे दगड व खड्डे पडले आहेत यामध्ये वृद्ध नागरिक महिला या पडत असून जखमी झाले आहेत. यामुळे या ठिकाणी तात्काळ सिमेंट कॉंक्रीट करण्यात यावे.

श्री पाटील पुढे म्हणाले की, वृद्ध भूमीहीन श्रावण बाळ अपंग निराधार यासह विविध अनुदान ज्या लाभार्थ्यांची सुरू आहे हे कोणत्याही परिस्थितीमध्ये बंद करू नये व त्यांना हयातीच्या दाखल्यासाठी उत्पन्नाचे दाखल्याची अट घालू नये व तशा पद्धतीचे दाखले मागणी करू नयेत. विविध लाभार्थ्यांच्या प्रकरणी मंजूर करण्यासाठी दर महिन्यात तहसीलदार यांनी मीटिंग घ्यावी व विनाकारण अडवणूक करू नये मागील झालेल्या मोर्चाच्या वेळी दिलेले आश्वासन अद्याप पूर्ण का केले गेले नाही असे सांगून श्री पाटील यांनी तालुक्यातील सर्व झोपडपट्टी परिसरामध्ये घरकुल मिळाले नाही व त्यांची सिटीसर्वे ला कर्ज शहरांमध्ये असणाऱ्या राजीव गांधी नगर अक्काबाई नगर या श्रीनगर नया नगर या ठिकाणच्या नोंदी झालेल्या नाही त्या तात्काळ कराव्यात अशी मागणी केली.

यावेळी बोलताना शब्बीर पठाण म्हणाले की, कर्जत बस स्थानकावर तात्काळ कॉंक्रिटीकरण करण्यात यावे. जर न्यायालयामध्ये वाद चालू असेल तर केवढा परिसर सोडून उर्वरित भागांमध्ये सहा महिन्याच्या आत कॉंक्रिटीकरण एसटी महामंडळाने केले नाही तर एकही एसटी व स्थानकाच्या बाहेर निघू देणार नाही. अपंग व ज्येष्ठ नागरिक यांना शिवशाही यासह सर्व एसटी बस मध्ये प्रवास देण्यात यावा. वृद्ध नागरिकांची आडूनुक होऊ नये. याशिवाय श्रावण बाळ संजय गांधी अपंग यासाठी कोणत्याही प्रकारचे दाखले विनाकारण म ागणी करण्यात येऊ नये. प्रकरणे नवीन मंजूर करताना तहसील कार्यालयामध्ये विनाकारण अडवणूक करण्यात येते तसेच दलालांच्या मार्फत पैसे घेऊन श्रीमंत नागरिकांची प्रकरणी करण्यात येत आहे याशिवाय सेतू कार्यालयामध्ये दाखल्यासाठी जास्त पैसे घेण्यात येत आहेत हे तात्काळ तहसीलदार यांनी थांबवावे अशी मागणी शब्बीरभाई पठाण यांनी केली. यावेळी अशोक जायभाय सोमनाथ भैलुमे यांच्यासह अनेकांची भाषणे झाली.

तहसीलदार गुरु बिराजदार यांनी कोणत्याही जेष्ठ नागरिकाची अडवणूक होणार नाही व सर्व प्रलंबित प्रश्न आणि मागण्या तात्काळ सोडून असे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

# शाहू महाराज म्हणजे सर्वगुणसंपन्न राष्ट्रपुरुष : अजय पवार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मागास समाजाला आरक्षण देणारा पहिला राजा, मुलांना शिक्षण मिळावे म्हणून जे पालक आपल्या मुलांना शाळेत घालणार नाहीत त्यांना एक रुपये दंड ठोठावणारा कला, क्रीडा व शिक्षण यांना राजाश्रय तसेच अंधश्रद्धा, कर्मकांडे, दैववाद यावर प्रहार करून समाजाची घडण करणारा सर्वांगसंपन्न राष्ट्रपुरुष म्हणजे छत्रपती शाहू महाराज होय, असे प्रतिपादन जिल्हा क्रीडाधिकारी अजय पवार यांनी केले.

नगर तालुक्यातील राळेगण येथील श्रीराम विद्यालयात छत्रपती शाहू महाराजांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी ते बोलत होते. विद्यालयाने क्रीडा क्षेत्रात आतंरराष्ट्रीय स्तरापर्यंत झेप घेतल्याने शाळेचे व संस्थेच्या नावलौकीकात भर घातल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी सुधीर चपळगावकर यांनी शाळेचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. ना. ज पाऊलबुधे विद्यालयाचे मा. प्राचार्य भरत बिडवे यांनी अध्यापनासाठी सर्व वर्गात वापरत असलेल्या इंटरॅक्टीव्ह बोर्ड तसेच डिजीटल अध्यापन पद्धती तसेच शाळेच्या गुणवत्तेबाबत मुख्याध्यापक व स्टाफचे कौतुक केले.

प्राचार्य अण्णासाहेब लोंढे, मुख्याध्यापक विजय जाधव, राजेंद्र कोतकर, संजय भापकर, हरीभाऊ दरेकर यांची भाषणे झाली. मुख्याध्यापकपदी निवड झाल्याबद्दल विजय जाधव यांचा मान्यवरांनी सत्कार केला. विद्यालयाच्या वतीने पाहुण्यांना शाहूंचा चरित्र ग्रंथ भेट देण्यात आला.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## पालिका निवडणुकांमुळे हिंदीला विरोध

चालत नाही? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

मराठी आणि हिंदी कॉम्पिटिशन झाली तर पहिली मराठीच निवडली जाईल. मराठी सोबत कोणतीही कॉम्पिटिशन नाही. मात्र त्याचवेळी आमच्या मुलांना तीन भाषा शिकायच्या आहे. तीन भाषा शिकले नाही तर नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे क्रेडिट मिळणार नाही. नवीन भाषा न शिकल्यामुळे मराठी विद्यार्थ्यांचे क्रेडिट कमी होणार आहे. त्यामुळे चांगले मार्क घेऊन देखील राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचा नंबर लागणार नाही. हे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मागे ओढण्यासारखे आहे.

## वैजापूर तालुक्यात एकाच महिन्यात तीन हत्या

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दिसल्या. त्यांनी तातडीने गावकऱ्यांना आणि वैजापूर व विरगाव पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी श्वान पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांचा तपास सुरूघटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी तात्काळ पंचनामा केला. संगीता ताई यांचा मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा बारकाईने तपास केला असता, मंदिराची दानपेटी चोरीला गेल्याचे आढळून आले.

विरगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.या घटनेमुळे चिंचडगाव आणि परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. संगीता ताई या त्यांच्या कीर्तन आणि धार्मिक कार्यासाठी परिचित होत्या. त्यांच्या अकस्मात आणि क्रूर हत्येने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गावकऱ्यांनी पोलिसांना तातडीने या प्रकरणातील गुन्हेगारांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.विरगाव पोलिसांनी या प्रकरणी कोणतीही माहिती असणाऱ्या व्यक्तींना पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. अज्ञात हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी श्वान पथकासह तपास यंत्रणा कार्यरत आहे. या घटनेचा तपास लवकर पूर्ण होऊन गुन्हेगारांना अटक होईल, अशी आशा गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार रमेश बोरनारे हे दाखल झाले.या घटनेने परिसरातील धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आश्रम आणि मंदिरांसारख्या ठिकाणी रात्रीच्या वेळी पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याने अशा घटना घडत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. पोलिसांनी याप्रकरणी तपास तीव्र करून लवकरात लवकर गुन्हेगारांना पकडावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## शिकारे पिता पुत्राच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे आदेश

सुरवसे,भाजपा जामखेड तालुका अध्यक्ष बापूराव ढवळे, मार्केट कमिटीचे सभापती शरद कार्ले, सरपंच सचिन शिकारे, दादासाहेब दाताळ, कैलास शिकारे, शामराव शिकारे, भीमराज शिकारे, गणेश शिकारे इत्यादी सह बाळगावांचे ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## हिंदी सक्तीवर संतापल्या सुप्रिया सुळे

कळते. तुम्हाला भेटले की माझी तक्रार त्यांच्या कनावार घाला. मला त्यांच्यासोबत काही विषयावर बोलायचे आहे. हिंदी भाषेचा प्रश्न, शेतकऱ्यांची कर्जमाफी, तेली समाजाचा प्रश्न असे काही विषय आहेत. मुख्यमंत्री दरवर्षी संसदेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सर्व खासदारांशी संवाद साधतात. पण गत दोन अधिवेशनापासून मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली नाही. माझ्यावतीने तुम्ही त्यांना खासदारांची बैठक बोलावण्याची विनंती करा, अशी मिश्किल टीप्पणीही त्यांनी यावेळी केली. जयंत पाटील भाजपत जाण्याची चर्चा आहे. याविषयी पत्रकारांनी सुप्रिया सुळे यांना छेडले असता, त्यांनी पत्रकारानांच उलटप्रश्न करत त्यांना घेरण्याचा प्रयत्न कलो. जयंत पाटलांनी भाजपमध्ये येण्यासाठी अप्लिकेशन केले आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दुसरीकडे, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना ५ तारखेच्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. राज्य सरकार महाराष्ट्रात जी हिंदी सक्ती लादू इच्छित आहे त्याविरोधात दिनांक ५ जुलै २०२५ रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन मी करत आहे.

कुणाचाही विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेलाही विरोध नाही. पण इयत्ता पहिलीपासूनचं प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे. जो योग्य आहे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष म्हणून आमचीही हीच भूमिका आहे. शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार.

## शिवसेना हिंदूहृदय सम्राटांची, टोमणे सम्राटांची नाही:एकनाथ शिंदे

भंडारावासियांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भंडारावासियांचे आभार मानताना एकनाथ शिंदे म्हणाले की, पवनी- भंडारा हा वाघांचा जिल्हा आहे. मात्र, मागील विधानसभा निवडणुकित विरोधकांनी खरी शिवसेना कोणती यावरून रान उठवले होते. आम्ही जनतेच्या दरबारात जाऊन न्याय मागू अशी पोकळ वल्गना विरोधक करत होते. पण जनताही सुज्ञ आहे, याची जाणीव सुरुवातीपासूनच आम्हाला होती, म्हणूनच भंडारा- पवनी येथील मतदारांनी सच्चा शिवसैनिक भोंडेकर यांना भरघोस मतांनी निवडून देत खरी शिवसेना कोणती याची पावती दिली. वाघाचे कातडे पांघरुण लांडगा कधी वाघ बनू शकत नाही याची प्रचिती आपण भंडारेकरांनी दिली. त्याबद्दल मी लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ आपले आभार मानायला आलो असल्याचे शिंदे आपल्या भाषणात म्हणाले.

# ग्राहकांना सुरक्षित आर्थिक व्यवहार करता येणार

## आ. आशुतोष काळे; पद्मविभूषण डॉ. पवार पतसंस्थेची क्यूआर कोड सुविधा प्रगतीचे द्योतक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : पतसंस्था क्षेत्रात नावाजलेल्या कोपरगाव तालुक्यातील पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सहकारी पतसंस्थेने डिजिटल व्यवहाराकडे अजून एक पाऊल पुढे टाकतांना आपल्या ग्राहकांसाठी क्यू आर कोडची सुविधा उपलब्ध करून दिली हे प्रगतीचे द्योतक असून व्यापाऱ्यांनी व्यवसाय वाढीसाठी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन व्यवहार करावेत, असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे.

> ग्राहकांच्या सेवेसाठी राष्ट्रीयकृत बँकेबरोबरच सर्वच बँकांनी डिजिटल व्यवहार सुरु केले आहेत. संस्थेने देखील वेळीच काळाची पावले ओळखून यापूर्वीच ऑनलाइन बँकिंग सुविधा, एसएमएस सुविधा, आरटीजीएस व एन.एफ.टी सुविधा सुरू केली असून या सेवेचा ग्राहक लाभ घेत आहेत.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सहकारी पतसंस्थेने सुरु केलेल्या क्यू आर कोड सेवेचे वितरण नुकतेच आ. काळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

आ. काळे म्हणाले की, कर्मवीर शंकररावजी काळे यांनी छोट्या-मोठ्या उद्योजकांना तसेच व्यापारी व शेतकरी वर्गाला आर्थिक सुबत्ता देण्याचं काम केल आहे. तीच परंपरा कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक मा. आ. अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आजतागायत सुरु आहे. त्यामुळे संस्था दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने



झेप घेत आहे.

त्यामुळे आपण देखील कोणत्याही बाबतीत मागे न राहता पतसंस्थेच्या ग्राहकांना सर्व प्रकारच्या डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सहकारी पतसंस्थेने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. त्यामुळे निश्चितच व्यापाऱ्यांकडे येणाऱ्या ग्राहकांना अधिक सोपा, जलद व सुरक्षित आर्थिक व्यवहार करता येणार असल्याचा विश्वास आ.आशुतोष काळे यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी संस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, व्हा. चेअरमन रावसाहेब चौधरी, संचालक अनिलराव महाले, सुदामराव वाबळे, व्यंकटेश बारहाते, महेन्द्र काळे, वीरेंद्र शिंदे, ज्ञानेश्वर हाळनोर, तालिब सय्यद, चंद्रशेखर कडवे, भाऊसाहेब लुटे, भाऊसाहेब माळशिखरे, रविंद्र निकम, व्यवस्थापक मंगेश देशमुख, त्यांचे सहकारी तसेच व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोंगरगणच्या ज्ञानेश योगाश्रमच्या दिंडीचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जवळच असणाऱ्या डोंगरगण येथील जंगले महाराज शास्त्री यांच्या ज्ञानेश योगाश्रम संस्थेच्या पंढरपूर आषाडी दिंडी सोहळाचे नगरमध्ये बुरूडगाव रोड येथील नक्षत्र लॉन येथे आगमन झाल्यावर भक्त मंडळाकडून स्वागत व सेवा करण्यात आली.

भागवत महाराज जंगले शास्त्री यांचे व वारकर्‍यांचे स्वागत रयत शिक्षण संस्था,सातारा जनरल बॉडी सदस्य आर्किटेक अनिल साळुंके यांनी स्वागत केले व पादुका पूजन, रथाचे पूजन करण्यात आले.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौदर, जालिंदर बोरुडे, शहर बँकेचे संचालक अशोक कानडे, विष्णू फुलसौदर, अशोक बाबर, साळुंके परिवारासह उपस्तिथ होते. दुपारी वारकऱ्यांना भोजन सेवा साळुंके परिवाराच्या वतीने देण्यात आली. तसेच औषधाचे किट देण्यात आले,नगरमधून मोठ्या प्रमाणावर लोक या दिंडीमध्ये सहभागी होतात. यामध्ये सुशिक्षित, सरकारी नोकरदार, अधिकारी, उद्योजक यांचा समावेश असतो. हि स्वावलंबी व कडक शिस्तीची पायी दिंडी म्हणून प्रसिद्ध आहे.



# गुणवंत विद्यार्थ्यांसह कर्तृत्ववानांचा गौरव सोहळा

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या कार्याचा विशेष गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : राजूर रोडवरील इंदोरी फाटा येथे स्थित मातोश्री लॉन्स या ठिकाणी दि. २५ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व अकोले शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा भव्य गौरव सोहळा उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

या उपक्रमाचे हे सलग २२ वे वर्ष असून, अकोले तालुक्यातील ९० माध्यमिक शाळा, ३२ आश्रमशाळा व १२ उच्च माध्यमिक विद्यालयांतील दहावी व बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच यावेळी शालेय




विद्यार्थ्यांना शालेय वस्तू यामध्ये वह्या, दप्तर तसेच छत्री वाटप करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये केवळ शैक्षणिक गुणवत्तेचा सन्मान न करता, समाजकार्य, प्रशासन, पत्रकारिता, करिअर मार्गदर्शन, शैक्षणिक व्यवस्थापन आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील योगदानाबद्दलही अनेक मान्यवरांना विशेष गौरव करण्यात आला. ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांचा विशेष सन्मान हा ठरला. समाजसेवेत त्यांनी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने त्यांना विशेष आदराने गौरविण्यात आले.

घनश्याम माने म्हणाले की, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, माहिती तंत्रज्ञान, उद्योजकता, संरक्षण सेवा, तसेच शासनाच्या विविध योजनांतून मिळणाऱ्या संधी याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःवर विश्वास ठेवा, ध्येय ठरवा आणि सातत्याने प्रयत्न करत राहा असा सकारात्मक संदेश दिला.

माने सरांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते देखील मोठ्या यशाची शिखरे गाठू शकतात हे विविध यशस्वी उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. त्यांनी करिअर निवडीवेळी आवड, क्षमता आणि उपलब्ध संधी यांचा समतोल साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी नानजीभाई ठक्कर, डॉ. विश्वासराव आरोटे, किरण लोहरे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, नवनाथ जाधव, विद्याचंद्र सातपुते, भाऊसाहेब वाकचौरे, अनिल राहणे, सोमनाथ काळे, मा. घनश्याम माने आदी उपस्थित होते.

# श्री मुलिकादेवी विद्यालयात मोफत गणवेश वाटप

## पारनेर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात उपक्रमशिल शाळा म्हणून ओळख

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्यमिक, उच्च माध्य व तंत्र विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ, ज्ञानेश्वर वरखडे, खंडू भूकन, किसनराव घोगरे, विलासराव हारदे, मंगेश लाळगे, अप्पा वराळ, भास्करराव वराळ, सचिन जाधव, सुयश वराळ, अक्षय वरखडे, सुल्तान सय्यद आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे, उपप्राचार्य कैलास मोकळे, पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे,




तंटा मुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेश लाळगे, माजी उपसभापती खंडू भूकन यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी विद्यालयातील १२८ हुशार व गरजू विद्यार्थाना शाळेतील शिक्षकांतर्फे गणवेश वाटप करण्यात आले.

प्राचार्य अंकुश अवघडे यांनी राजर्षी शाहू महाराजांचे कार्य विषद केले. उच्च माध्यमिक विभागाचे समन्वयक, शिक्षक प्रा. किरण पाडळकर, दारकू खोडदे, अमोल खिलारी व विद्यालयातील जेष्ठ शिक्षक शिवाजी गुंजाळ, राजेंद्र गोरखे, बाबाजी शिंदे, धनंजय खोसे, महेबूब इनामदार, प्रवीण आवारी, सुनील औटी, अरुण काळे, सुनताज इनामदार, पोटे आदी उपस्थित होते.

शिक्षक भास्कर काकडे यांनी प्रास्ताविक केले. दादासाहेब ठवाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सबाजी बेलोटे, पुष्पा वराळ यांनी सूत्रसंचालन केले. तर संगीता दिघे यांनी आभार मानले.

# वारकरी श्रद्धा व सामाजिक सलोख्याचे प्रतीक

## डॉ. संतोष गिऱ्हे; जिल्हा क्रीडा कार्यालय व उमंग फाउंडेशनचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान करत असलेल्या राहुरी-पंढरपूर पायी दिंडीचे नगर शहरात आगमन झाले. यानिमित्ताने जिल्हा क्रीडा कार्यालय व उमंग फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने युवक कल्याण योजनेअंतर्गत आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात तब्बल २४५ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमात डॉक्टरांनी प्रत्येक वारकऱ्याची तपासणी करून गरजेनुसार औषधे दिली, तसेच सर्व वारकऱ्यांना फळवाटपही करण्यात आले.

शहरातील कोंबडी मळा, सोलापूर चौक परिसरात हे शिबिर पार पडले. दिंडीतील मुख्य प्रवर्तक राम महाराज यांचा सत्कार करून गौरवण्यात आले.




याप्रसंगी उमंग फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. संतोष गिऱ्हे, सचिव वैशाली कुलकर्णी, राष्ट्रीय मनावधिकार हक्कच्या सचिव कविता भिंगारदिवे, नयना बनकर, काळजापार बहुउद्देशीय संस्थेचे कविता बाळासाहेब नेटके, बाळासाहेब नेटके, ॲड. दिनेश शिंदे, ॲड. महेश शिंदे, महेंद्र गिऱ्हे, पास्टर वाघमारे आदी उपस्थित होते.

डॉ. संतोष गिऱ्हे यांनी वारकरी समाज हा आपल्या श्रद्धा, सेवाभाव आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी असून, या भावनेने हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरास संजीवनी आर्थो ॲण्ड स्पाईन सेंटरचे विशेष सहकार्य लाभले. उमंग फाऊंडेशनचे डॉ. संतोष गिऱ्हे यांनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली. या उपक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावळे, विशाल गर्जे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांचे मार्गदर्शन लाभले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत वारकऱ्याचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : तालुक्यातील दहेगाव बोलका येथील भिमराज बाळकृष्ण नवले वारकरी हे पायी दिंडी सोहळ्यात पंढरपूरच्या दिशेने जात असताना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. ही घटना अहिल्यानगर तालुक्यातील दहेगाव येथे गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडली आहे.



याप्रकरणी नवले यांचे जावई रामदास कैलास नेहे (वय २८, रा. धोंडेवाडी जवळके ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर) यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात वाहना विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी दहिगाव येथील म्हस्के वस्ती येथे मुक्कामी असताना गुरुवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास भिमराज नवले हे प्रातविधी करीता रोडच्या पलीकडे गेले होते. त्यानंतर काही वारकरी यांनी दिडीतील लोकांना सांगितले की, नवले यांना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने ते रोडवर पडले होते.

नवले यांना खुप मार लागल्याने ते रक्तभंबाळ झाले होते. त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले. दरम्यान मयत भीमराज नवले यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वैजापूर येथील युवासेना पदाधिकारी संतोष बंगाळ यांचे ते काका होते.

# उमेश लोटके यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरवपूर्ण सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : तालुक्यातील खंडाळा येथील उमेश चंद्रभान लोटके भारतीय सैन्या मधून (बॉम्बे इंजिनिअर ग्रुप खडकी १०६ रेजिमेंट) सेवानिवृत्त झाले आहे. त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त अरणगाव ते खंडाळा त्यांची मिरवणूक काढण्यात आली. तर ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

उमेश यांनी भारतीय सैन्यात १७ वर्षे देश सेवा केली. देशातील लेह, लदाख, पालमपूर, पंजाब, जयपुर, जोधपुर, पुणे येथे सेवा बजावून ते नुकतेच निवृत्त झाले आहेत. ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. उद्योजक राहुल चंद्रभान लोटके, खंडाळा, खडकी, वाळकी, अरणगाव, बाबर्डी, नगरशहर सर्व सरपंच, ग्रामस्थांच्या वतीने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर म्हणाले की, देशाचे सैनिक करत असलेली देश सेवा ही ईश्वर सेवा आहे. उमेश लोटके यांनी आहोरात्र हीच ईश्वर सेवा केली. त्यांनी सीमेवर राहून आपल्या आई, वडील, पत्नी, मुले यांची सेवा केली, एक शेतकरी गरीब कुटुंबातील पुत्र सीमेवर जाऊन आपल्या देशाचे रक्षण करतो, ही खूप मोठी गोष्ट आहे. आपल्या गरीबीवर मात करून १७ वर्ष सीमेवर काढली यांच्यावर संस्कार करणारे आई-वडील पुण्यवंत असल्याचे त्यांनी सांगितले.पुढे इंदुरीकर महाराज यांनी आई-वडिलांच्या प्रेरणा व संस्काराने माणूस मोठा होऊ शकतो. आजच्या काळातील आई-वडील मुलांना आपल्या हाताच्या फोड प्रमाणे जपतात. पण संस्कार देण्यामध्ये मागे पडत आहेत. कोट्यावधी रुपयांचे बंगले असणारे सुखी-समाधानी नाही. समाधानी रहायचं असेल तर देवा पेशा आपल्या आई-वडील ची सेवा करण्याचे त्यांनी आवाहन केले.

# शेवगाव शहर भक्तीमय वातावरणाने फुलले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : ३०० वर्षाची परंपरा असलेली श्री.सखाराम महाराज अमळनेरकर विठ्ठल रुक्मिणी संस्थान अमळनेर जिल्हा जळगाव येथून दर वर्षी सुमारे ७५० की. मी. पाई आषाढी वारी अमळनेर ते पंढरपूरला जाणारी प्रसाद महाराज यांचे अधिपत्याखाली जाणारी दिंडी आपल्या शेवगाव शहराला पवित्र पदस्पर्श करून पुढे मार्गस्थ होते.

बुधवार दि. २५ जुन रोजी मारवाडी गल्लीमधील बालाजी मंदिरामध्ये दिंडी सोहळ्याचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी प्रसाद महाराज यांचे प्रणव संजय संजय शेवाळे यांनी सपत्नीक पाद्यपूजन केले. सुमारे ४०० ते ५०० वारकऱ्यांची वैद्यकीय सेवा महाप्रसादाची आणि पालखी मुक्कामाची सोय शेवाळे सराफ यांच्या मार्फत करण्यात आली.

> **पंढरपूरमध्ये सर्वात मानाची पहिली दिंडी**
>
> पंढरपूरमध्ये सर्वात मानाची पहिली दिंडी सखाराम अमळनेरकर महाराजाची असते. आपल्या शेवगावकरांचे फार मोठे भाग्य आहे की, साक्षात श्री. सखाराम महाराजांना भगवंत पांडुरंगानी दृष्टांत देऊन त्यांना पंढरपूर च्या चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये पांडुरंगाची अत्यंत तेजस्वी स्वयंभु मूर्ती साक्षात प्रकट झाली आहे. ती मनमोहक मूर्ती महाराजांबरोबर पाई दिंडीमध्ये दरवर्षी सहभागी असते.

शेवगाव शहरातील सर्व भाविक भक्त व दिंडीतील वारकरी यांना महाप्रसाद भोजन दरवर्षी दिले जाते. या सर्व वारकऱ्यांची सेवा करण्याची दरवर्षी शेवगावचे सराफ संजय शेवाळे यांच्याकडे असते व त्यांना ही सेवा पांडुरंगा चरणी अर्पण करण्याची संधी मिळते.

शेवगाव शहरात महाराजांचे निसिम्म भक्त असणारे श्रीराम मंदिराचे राजेंद्र गालफाडे, सुहास गालफाडे, संजूदेवा मुळे, लक्ष्मीकांत वेलदे, प्रसाद डोम, सुभाष खांदाट, शिवाजी धनगर त्यांच्या भक्तांच्या भेटीला व आशीर्वाद देण्यासाठी जात असतात. यावेळी शहरातील हजारो भाविक भक्त त्यांचे दर्शन घेऊन दिंडीचे पुण्य आपल्या पदरात पाडुन घेत असतात. यानंतर दिंडी पाथर्डी मार्गे पंढरपूरकडे रवाना होते. यात शेवगावसह पाथर्डीचे भाविक भक्त सहभागी असतात.

# अमृतवाहिनी बी फार्मसीचा संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा

## १८ विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्तरावर यश; अपेक्षा दिघे हिचा जी पॅट स्पर्धेत देशात ५३ वा क्रमांक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : उच्च व गुणवत्तेच्या शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवणाऱ्या अमृतवाहिनी औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयातील १८ विद्यार्थ्यांनी जी - पॅट २०२५ या स्पर्धेत मोठे यश मिळवली असून अपेक्षा दिघे येणे या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये देशातून ५३ वा क्रमांक मिळवला असून यशराज काळे यांनी ६९ वा क्रमांक मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असल्याचे प्राचार्य डॉ. मच्छिंद्र चव्हाण यांनी सांगितले आहे.

> **दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक**
>
> सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डॉ. जे. बी. गुरव, प्रा. व्हि. बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. मच्छिंद्र चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

> शैक्षणिक वातावरण सुंदर परिसर विद्यार्थ्यांची राहण्याची चांगली व्यवस्था याचबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संशोधनासाठी प्रोत्साहन यामुळे या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये यश मिळवले आहे.
>
> **– शरयूताई देशमुख**

प्राचार्य डॉ. चव्हाण म्हणाले की, माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे व संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने नेकचा ए दर्जा मिळवला आहे. याचबरोबर राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे महाविद्यालयाचा गौरव झाला आहे.

नुकत्याच जी पॅट २०२५ (ग्रॅज्युएट फार्मसी अपडेट टेस्ट) मध्ये फार्मसीच्या १८ विद्यार्थ्यांनी



ये संपादन केले आहे. या परीक्षेत ४८ हजार ६४६ विद्यार्थी बसले होते. यापैकी अपेक्षा दिघे ही ने ५३ वा क्रमांक मिळवला. तर यशराज काळे यांनी ६९ वा क्रमांक मिळवला.

याचबरोबर हर्षल मानकर, यश जाधव, वैष्णवी गोंगे, देवेंद्र भोसे, आकाश दुबे, तुषार ढेरे, साक्षी गुंजाळ, शुभम भगत, विजय दळवी, वैभव नजन, अश्विनी देशमुख, प्रनिषा खेमनर, तेजल कुरकुटे ,अविष्कार गायके, सलोनी केदारी, तय्यबा पठाण यांनी यश मिळवले आहे. तर नायपर जेईई २०२५ या परीक्षेमध्ये अपेक्षा दिघे, यशराज काळे, हर्षल मानकर, यश जाधव यांनी उत्कृष्ट बँक मिळून गुणवत्ता सिद्ध केली आहे.

# अशोक कॉलेज ऑफ फार्मसीचा उत्कृष्ट निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अशोकनगर** : अशोक कारखान्याचे चेअरमन व माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील व अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली अशोक कॉलेज ऑफ फार्मसीच्या डिप्लोमा अभ्यासक्रमाचा उन्हाळी परीक्षा २०२५ चा निकाल उत्कृष्ट लागला असल्याची माहिती प्राचार्य प्रसाद कोते यांनी दिली.

द्वितीय वर्षामधील सामिया कुरेशी (७९), श्रावणी सोनवणे (७७.३६), साहिल काझी (७६.४६) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. त्याचप्रमाणे प्रथम वर्षातील श्रेया जाधव (७८.७०), सौंदर्या मोहन (७१.५०), मेहविश शेख (६९) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. सदर विद्यार्थ्यांना प्राचार्य प्रसाद कोते, विभाग प्रमुख प्रा.किरण थोरात, परिक्षा प्रमुख प्रा.चैतन्य घोलप आदीं वर्ग शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.



# जिल्ह्यातील धरणांमध्ये पाणी साठ्यात वाढ

## भंडारदरा ५३, निळवंडे ४५, गोदावरी धरणे ४१ टक्के भरले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : आहिल्यानगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या भंडारदरा, निळवंडे तसेच मुळा धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. गतवर्षीपेक्षा ही वाढ लक्षणिय असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. याशिवाय जायकवाडी धरणातही मुबलक पाणीसाठा झाल्याने यंदा समन्यायी पाणी वाटपाचे भुतही मानगुटवर नसणार आहे. धरणातील पावसाचे आगार असलेल्या भंडारदरा धरण पाणलोटक्षेत्रातील घाटघर, रतनवाडी, पांजरे आदी भागांत एक दिवसाच्या धूमशानानंतर पावसाचा जोर पुन्हा मंदावला आहे. यामुळे धरणात येणाऱ्या पाण्याचा वेगही कमी झाला



आहे. भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ५३ तर निळवंडेचा ४५ टक्क्यांवर पोहोचल्याची नोंद झाली. तर आढळा धरणाचा पाणीसाठा ९० टक्क्यांवर पोहोचला आहे. यावर्षी जून महिन्यातच पावसाने जोरदार बॅटिंग गेल्याने धरणांतील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. यामुळे धरणांचे पोट विस्तारत आहे. गेल्या काही तासांत भंडारदरा धरणात २३५ दलघफू तर निळवंडेत १०२ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. आता पावसाचा जोर काहीसा मंदावल्याने धरणात येणाऱ्या नवीन पाण्याचा वेगही कमी झाला आहे. असे असले तरी या महिन्यातच धरणांनी अनपेक्षित पाणीपातळी गाठली आहे. यामुळे भात उत्पादक शेतकऱ्यांसह खरीपाची पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना चांगलाच दिलासा मिळाला आहे. याचबरोबर देवठाण येथील आढळा मध्यम प्रकल्पाचा पाणीसाठा ९० टक्क्यांवर पोहोचल्याने लाभक्षेत्रातील शेतकरी आनंदी झाले आहे. दरम्यान, गेल्या २४ तासांत घाटघर येथे ४७, भंडारदरा २०, पांजरे २३, रतनवाडी ४१, वाकी १२, निळवंडे ४, आढळा ३ तर अकोलेत २ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

### मुळाचा पाणीसाठा १२ हजार दलघफू

राहुरी तालुक्यातील मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून धरणात पाण्याची आवक स्थिर असून धरणाने १२ हजार दलघफूचा टप्पा गाठल्याने लाभक्षेत्रात चिंतेचे सावट कमी झाले आहे. काल (दि. २६) सकाळी आवक २ हजार ८२९ क्युसेसने सुरू होती. धरणात पाणीसाठा ११ हजार ८३१ दलघफू होता. तसेच गरूवार दि. २६ रोजी सायंकाळी ६ वाजता धरणात पाण्याची आवक ३ हजार ४१६ क्युसेस होती. पाणीसाठा ११ हजार ७०९ दलघफू इतका होता. गेल्या २४ तासात काल सायंकाळपर्यंत मुळा धरणात २५९ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली तर यावर्षी धरणात ३ हजार ६२ दलघफू नविन पाणी आले.

# तालुक्यातील कलाकार सन्मान योजनेसाठी अर्ज दाखल करा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव** : तालुक्यातील कलाकार सन्मान योजनेसाठी अर्ज दाखल करावेत, असे आवाहन तालुक्यातील चांदेकसारे येथील लोककला व लोककलावंत अभ्यासक अरुण खरात यांनी केले आहे. खरात म्हणाले की, राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना प्रति महिना ५ हजार रुपये मानधन देण्यात येते. या योजनेसाठी १ जुलै ते ३१ जुलै २०२५ या दरम्यान 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. या योजनेसाठी लाभार्थ्याचे वय हे ५० वर्षांपेक्षा अधिक असावे आणि दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे करण्यात आली आहे. कला किंवा साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक आहे. विधवा,परितक्त्या, दिव्यांग व वयोवृद्ध कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे.लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न हे ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. ज्यांची उपजीविका केवळ कलेवर अवलंबून आहे, अशा कलाकारांनाच प्राधान्य देण्यात येईल.

# विद्यार्थ्यांनी मानवाधिकार विषयी जागृती करावी

## प्राचार्य डॉ. आहेर; मानव अधिकार प्रशिक्षण कार्यशाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : समाजात भलेही साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी साक्षर झालेल्या सर्वांना मानवाधिकार विषयी माहिती असेलच असे नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत मानवाधिकार विषयी माहिती देऊन त्यांना आपल्या अधिकाराची जाणीव करून द्यावी व त्या अनुषंगाने जागृती करावी, असे आवाहन पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंगनाथ आहेर यांनी केले. पारनेर कॉलेज व राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय मानव अधिकार प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. पुढे ते म्हणाले की, मानवाधिकार हे माणसाला मिळालेले निसर्गदत्त अधिकार आहेत. हे अधिकार वापरून सामान्य माणूस ही आपले जीवन सुखी आणि आनंदी बनवू शकतो. त्याला त्याच्या अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केल्यास हे काम अधिक सुलभ होईल.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेवगाव महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. गोकुळ मुंढे होते.

कार्यशाळेच्या प्रास्ताविकात प्रा. डॉ. विजयकुमार राऊत यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मानवाधिकाराची ओळख होण्यासाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने महाविद्यालयास विशेष बाब म्हणून दोन दिवसीय कार्यशाळा मंजूर केल्याचे सांगितले.

### कार्यक्रमास या मान्यवरांची होती उपस्थिती

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, शाखा समन्वयक डॉ. दिपक सोनटक्के, डॉ. रघुनाथन नजन प्रा. नितीन निपुंगे, प्रा. प्रकाश गावित, डॉ. अशोक घोरपडे, प्रा. शुभदा आरडे, प्रा. प्रतिक्षा तनपुरे, ज्युनिअर कॉलेजचे प्रा.अशोक शिंदे, प्रा. पुजारी, प्रा. सुजाता ठुबे, प्रा. व्यवहारे, प्रा. लंके, कार्यालय अधीक्षक सावकार काकडे आदी उपस्थित होते.

# गोदावरी नदीपात्रात वाळूमाफियांवर विशेष पथकाची कारवाई

## तिघा जणांना पकडले; जेसीबीसह वाळूने भरलेल्या ५ ट्रॉल्या जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : अहिल्यानगर पोलिसांच्या विशेष पथकाने गोदावरी नदीपात्रात गोधेगाव (ता. नेवासा) येथे छापा टाकत एक जेसीबीसह वाळूने भरलेल्या पाच ट्रॉली जप्त केल्या. पोलिसांची चाहूल लागताच पाचजण पसार झाले, तर तिघा वाळूतस्करांना पाठलाग करत पोलिसांनी ताब्यात घेतले. जिल्हा पोलीस अधीक्षक सोम नाथ घार्गे यांनी अवैध धंद्याविरोधात कारवाई करण्यासाठी परीविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली पथक नेमले आहे.



गोदावरी नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूचा उपसा करून वाहनांतून वाहतूक केली जात असल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने गोधेगाव येथे छापा टाकला असता गोदावरी नदीपात्रातून जेसीबीच्या साहाय्याने वाळूचा उपसा करून ट्रॉलीमध्ये भरताना काहीजण दिसले. पोलिसांना पाहताच काही जण वाहने जागेवरच सोडून पसार झाले. त्यातील तीन जणांना पोलिसांनी पाठलाग करुन पकडले. उर्वरित सहा जण पसार झाले आहेत.

कारवाई दरम्यान एक जेसीबी, वाळूने भरलेल्या पाच टॅक्टर एक असा एकूण ७५ लाख ८० हजारांचा मुद्देम ाल जप्त करण्यात आला. ही कारवाई परीविक्षाधीन पोलिस उपाधीक्षक खाडे यांच्या मार्गदर्शनाखालील राजेंद्र वाघ, शकील शेख, उमेश खेडकर, दिनेश मोरे, विजय ढाकणे, शंकर चौधरी यांच्यासह २० पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली.

वाळूतस्कर विजय दत्तात्रय ठोंबरे (रा. गोधेगाव, ता. नेवासा), प्रवीण नामदेव म्हस्के (रा. नेवासा खुर्द, नेवासा), अभिषेक भीमराज जाधव अटक केलेल्यांची नावे आहेत. राजेंद्र गलांडे, कल्याण उन्हाळे, काका पठारे व ट्रॅक्टरचा मालक दिलीप शेलार, कृष्णा पूनमसिंग परदेशी हे फरार झाले आहेत. त्यांच्याविरोधात नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला आहे.

# थोरात यांच्यावर हल्ला करणारा ताब्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती व खरेदी-विक्री देखरेख संघाचे अध्यक्ष इंद्रनाथ पाटील थोरात यांच्यावर भ्याड हल्ला करणाऱ्या पोलिसांनी त्याला न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. किरण रावसाहेब साळवे (वय ३४), रा. श्रीरामपूर वॉर्ड नं.२ असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

पंचायत समितीचे माजी सभापती इंद्रनाथ पाटील थोरात यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा पंचक्रोशीतील नागरिकांनी निषेध केला आणि या घटनेत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली होती. श्रीराम पूर शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तातडीने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर माजी सभापती दाखल इंद्रनाथ पाटील थोरात यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चार अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, बेलापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सुधीर हापसे, हवालदार बाळासाहेब कोळपे, संपत बडे, ज्ञानेश्वर वाघमोडे, भारत तमनर, रविंद्र अभंग यांनी तातडीने सूत्रे हलवून श्रीरामपूर येथील किरण रावसाहेब साळवी यास ताब्यात घेतले. त्यास न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# ब्रेक दर्शन व्यवस्था बंद करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**शिर्डी** : साई संस्थाने सुरू केलेली ब्रेक दर्शन व्यवस्था साईभक्तांसाठी उपयुक्त नसून या निर्णयामुळे संस्थानच्या उत्पन्नात अधिक घट झाल्याचे दिसून येत असल्याने संस्थान प्रशासनाने तात्काळ ब्रेक दर्शन व्यवस्था बंद करून वेळेचे बंधन उठवून पूर्वीप्रमाणेच साईभक्तांच्या मागणीनुसार सशुल्क दर्शन पास द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे अमृत गायके यांनी केली.

प्रसिद्ध पत्रकात गायके यांनी म्हटले आहे, साईबाबा संस्थान प्रशासनाने ब्रेक दर्शन व्यवस्था सुरू करण्याचा निर्णय घेऊन ब्रेक दर्शन घेणाऱ्या भाविकांना वेळेचे बंधन घालून दर्शन देण्याचा निर्णय घेतला. ब्रेक दर्शन व्यवस्था सुरू झाल्यापासून वेळेच्या बंधनामुळे सशुल्क पास घेऊन दर्शन घेणाऱ्या साईभक्तांची संख्या कमी झाल्याचे दिसून आले आहे. साईबाबा संस्थानचे उत्पन्न वाढावे या दृष्टीने व दर्शनासाठी भाविकांची वेळेची बचत व्हावी याकरिता तात्कालीन साईबाबा संस्थानचे अध्यक्ष जयंत ससाणे व त्यांच्या विश्वस्त मंडळाने शिफारस पत्राद्वारे २०० प्रति व्यक्ती दर्शन पेड पास सुरू केला होता. त्यांनी घेतलेल्या निर्णयाम ुळे संस्थांच्या उत्पन्नात वाढ होऊ लागली तसेच तथाकथित व्हीआयपींच्या गर्दीला यामुळे लगाम बसला. त्यांनी घेतलेल्या निर्णयाचे भाविकांनी स्वागत केले होते.

परंतु तदर्थ समितीने गेल्या चार-पाच दिवसांपासून ब्रेक दर्शन व्यवस्था सुरू केल्याने दूरवरून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना शुल्क पासद्वा-रे ब्रेक दर्शन घेण्यासाठी वेळेची मर्यादा येत असल्याने पेड पास घेणाऱ्या साईभक्तांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येत आहे. साई संस्थान प्रशासनाने तात्काळ ब्रेक दर्शन व्यवस्था बंद करून पूर्वीप्रमाणेच साईभक्तांना त्यांच्या स्वयंनुसार शुल्क पास देऊन साई समाधीचे दर्शन द्यावे, अशी मागणी अमृत गायके यांनी केली आहे.

# भोजापूर धरण ८५ टक्के भरल्याने आनंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : नाशिक जिल्ह्यातील सिन्नर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील निमोण-तळेगाव या दुष्काळी भागासाठी काही अंशी संजीवनी असलेल्या भोजापूर धरणामध्ये आजमितीस सुमारे ८५ टक्के (३०७ द.ल.घ.फु.) इतका उपयुक्त पाणी साठा झाला असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे सुरू असलेल्या पाणी आवक या अनुषंगाने हे धरण साधारणतः जुलैच्या पहिल्या आठवड्यातच ओव्हर फ्लो होण्याची दाट शक्यता असल्याचे इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी वर्तविली आहे. धरण लवकरच ओव्हर फ्लो होणार असल्यामुळे सांडव्यावरून वाहून जाणारे पूर पाणी या धरणाच्या लाभक्षेत्रातील संगमनेर व सिन्नर तालुक्यातील पाझर तलाव, गाव तळे, साठवण बंधारे व त्यानुसार ल.पा. तलावांमध्ये सोडण्याची मागणी होत असून,



त्या दृष्टीने नाशिक पाटबंधारे विभागाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करण्याचे देखील मागणी लाभक्षेत्रातून होत आहे. महत्त्वाचे म्हणजे जलसंधारण विभागामार्फत निमोण-तळेगाव या दुष्काळी विभागातील गावांमध्ये पूर पाणी पोहोचवण्याच्या दृष्टीने पूर्ण करण्यात आलेल्या भोजापूर चारीद्वारे ओव्हर फ्लोचे पाणी पोहोचविण्यात येणार असल्याचे यापूर्वी जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी यापूर्वीच घोषित केलेले आहे. या कामी संगमनेरचे आमदार अमोल खताळ हे देखील प्रयत्नशील आहेत. त्यानुसार नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक व जलसंधारण विभाग, अहिल्यानगरमार्फत कार्यक्षेत्रावर कार्यवाही देखील सुरू आहे. भोजापूर धरण जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात ओव्हर फ्लो होण्याची शक्यता असल्याने धरणाच्या लाभ क्षेत्रातील व पाण्यापासून वंचित राहिलेल्या लाभक्षेत्रालगतच्या गावातील तलाव भरावेत, अशी मागणी इंजि. चकोर यांनी केली.

# राजापूर साई पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील साईबाबा मंदिराच्या वतीने दर वर्षाप्रमाणे याही वर्षी राजापूर ते शिर्डी अशी पायी दिंडी शिर्डीच्या दिशेने रवाना झाली आहे. या पायी दिंडीचे समनापुर चौफुली जवळ आमदार अमोल खताळ पाटील यांच्या हस्ते स्वागत करून साईबाबांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण केला. यावेळी आमदार खताळ यांच्या हस्ते व राजापूर येथील साईभक्तांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. राजापूर येथील साईबाबा मंदिराचे बाबू सोनवणे यांच्या हस्ते आ. अमोल खताळ यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पालखी वडगाव पान निळवंडे जांभूळवाडी फाटा मार्गे शिर्डीकडे मार्गस्थ झाली. यावेळी गहीनाथ हासे,ज्ञानदेव हासे,भाऊराव देशमुख,बाबूसोनवणे, नानासाहेब हासे, भास्कर हासे, संदेश देशमुख, ऋषी हासे, जिजाबा हासे, राजाराम हासे यांच्यासह राजापूरचे साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मका, कापूस पिकांसाठी आता 'हेजिंग डेस्क'

## मुख्यमंत्री : शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या म ालाला योग्य बाजारमूल्य मिळावे, यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी हेजिंग डेस्क सुरू करण्यात आला आहे. टप्प्या-टप्प्याने इतर पिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किमतीतील चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. सेबीचे नियंत्रण असलेल्या एनसीडीईएक्स संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने या प्रकल्पासाठी सहकार्य केलं असून, हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने



एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची माहिती देताना सांगितले. कृषी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्याचा राज्याच्या सकल उत्पन्नात १२ टक्के वाटा आहे. मात्र राज्यातील शेतीमध्ये पिकांचे उत्पादन अजूनही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. शेतीमध्ये पेरणी करूनही निश्चित क्षमतेनुसार उत्पादन आणि उत्पादित मालाला योग्य भाव मिळण्याबाबत शेतकऱ्यांना नेहमीच चिंता असते. शेतकरी पिकांचे उत्पन्न घेतो तरी मालाची किंमत ठरवणारा नसतो ही अनिश्चितता कमी करण्यासाठी शासनाकडूनदेखील विविध शासकीय धोरणे, सुधारित शेती पद्धती, विविध पीक विमा योजनांचे पाठबळ शेतकऱ्यांना दिले जाते. शेतीतून किमान उत्पन्न मिळवण्यासाठी शाश्वत उपायोजना करणे गरजेचे आहे. हेच लक्षात घेऊन वैयक्तिक शेतकरी, मर्यादित संसाधने लक्षात घेऊन शेतकऱ्यांना बाजारपेठेतील ज्ञान मिळावे, यासाठी शासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचललंय. शेतकऱ्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून वाचविण्यासाठी एककेंद्रित समर्पित कृषी हेजिंग डेस्कची स्थापना पुणे येथे करण्यात आली आहे.

### हेजिंग डेस्क म्हणजे काय ?

हेज म्हणजे बाहेरून येणाऱ्या संकटांपासून संरक्षण देण्यासाठी, त्यांना अटकाव करण्यासाठी बांधलेले साधन, घराला जसे दार, तसे शेताला कुंपण. किम तीच्या चढ-उतारातून निर्माण होणाऱ्या संकटापासून संरक्षण देणारे जे साधन तेही एक प्रकारचे कुंपणच आहे, ज्याला हेजिंग म्हणतात. भविष्यकाळातील कमी होणाऱ्या किमतींपासून निर्माण होणारी जोखीम कमी करणे हा हेजिंगचा मुख्य उद्देश आहे.

# सेवानिकेतनमध्ये अंमली पदार्थविरोधी दिन साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव शहरातील सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांच्या उपस्थितीत जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून साजरा केला. याप्रसंगी सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूलच्या वतीने पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांचे स्वागत करुन सत्कार करण्यात आला. यानंतर अमली पदार्थ विरोधी दिनानिमि त्त विद्यार्थ्यांची संवाद साधतांना पोलीस निरीक्षक कुंभार म्हणाले की, २६ जून हा जगभर जागतिक अमली पदार्थ दिन म्हणून विविध उपक्रमांच्या स्वरूपात साजरा केला जातो. युनायटेड नेशन ऑर्गनायझेशन यांनी १९८८ साली याची घोषणा केली व २६ जून १९७८ या दिवशी चीनमधील पहिल्या अफू युद्धाच्या काळात अफू व्यापाऱ्यावर घातलेल्या बंदीचा संदर्भ या दिवसाला आहे. अमली पदार्थाची व्याख्या अशी आहे की ज्या पदार्थाच्या सेवनाने माणसाला विशिष्ट प्रकारची सुस्ती, नशा, डोळ्यांवर तार किंवा धुंदी येते. त्याला रूढार्थाने मादक पदार्थ किंवा अमली पदार्थ असे म्हणतात. या नशेच्या सेवनाने माणसाच्या शरीरावर वाईट परिणाम होतात. हे अमली पदार्थ सेवन करणे हा एक मानसिक आजार आहे. अमली पदार्थ सेवन केल्यास तो व्यक्ती एकाग्रता राहत नाही नैराश्य येऊन मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याचे कुंभार यांनी सांगितले.


शाळा कॉलेजचा परिसर हा तंबाखू मुक्त असला पाहिजे तसे शाळेच्या आत व बाहेर तसेच वर्दळीच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवावे, जेणेकरून काही घटना घडली तर आपल्याला त्यावर कार्यवाही करणे शक्य होईल, असे पोलीस निरीक्षक कुंभार शेवटी म्हणाले.




# अँजिओग्राम काढू का?

**विचारा प्रश्न**

मी ५८ वर्षांचा पुरुष असून नुकतीच हृदयाची सर्वसाधारण तपासणी करून घेतली. माझा ईसीजीचा अहवाल समाधानकारक नसल्याचं डॉक्टरांचं म्हणणं पडलं. त्यांनी मला ट्रेडमिल चाचणी करू दिली नाही. डॉक्टरांनी अँजिओग्राम काढून घेण्याचा सल्ला दिला. हा प्रकार खूप खर्चिक असल्याने मी पर्यायी उपाय विचारला. डॉक्टरांनी मला रेडिओ आयसोटोप स्कॅन करायला सांगितलं. यापैकी मी काय करायला हवं? माझ्या कुटुंबात हृदयविकाराचा इतिहास आहे. आधीच्या अँजिओग्राममध्ये ३० टक्के व्रण होते. आता काय करायला हवं?



**उत्तर :** कुटुंबातील हृदयविकाराचा इतिहास आणि गेल्या अँजिओग्राममध्ये ३० टक्के व्रण आढळल्याने तुम्ही पुन्हा अँजिओग्राम काढून घ्यायला हवा. पण डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे कमी खर्चिक पर्यायांचा विचार करू शकता. अशा परिस्थितीत आयसोटोप स्कॅनचा पर्याय निवडता येईल. यामुळे तुम्हाला अँजिओग्राफीची गरज आहे किंवा नाही हे कळू शकेल. अर्थात तुमच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी चर्चा करूनच योग्य तो निर्णय घ्यायला हवा.

# पित्ताशयातील खडे चिंताजनक

**आरोग्य विशेष**


सगेल्या काही वर्षांपासून पित्ताशयातील खड्यांचा त्रास होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. पित्ताशयातील खडे होण्याचे मुख्य कारण म्हणजे बदलती जीवनशैली. मळमळ, उलट्या, ताप, अपचन, ढेकर येणे, सूज येणे आणि कावीळ ही काही संबंधित लक्षणे आहेत. याव्यतिरिक्त पोटाच्या वरच्या भागात तीव्र वेदना होतात.

अनेकदा आम्लपित्ताचे दुखणे समजून बरेच लोक उपचारांना विलंब करतात. दर महिन्याला आठ ते नऊ रुग्ण ॲसिडिटीच्या तक्रारी घेऊन उपचारासाठी दाखल होतात. मात्र वैद्यकीय तपासणीनंतर पित्ताशयात खडे असल्याचे निदान होते. वेळेवर उपचार न केल्याने हे खडे आकाराने मोठे होतात. अशा वेळी डॉक्टरांना उपचार करणे आव्हानात्मक ठरते. त्यामुळे ॲसिडिटी जास्त दिवस राहिल्यास दुर्लक्ष न करता ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

पित्ताशयातील खडे आकार आणि रचनेने भिन्न असतात, काही लहान असतात, तर काही टेबल टेनिस बॉलच्या आकाराइतके मोठे असू शकतात. लठ्ठपणा, जलद वजन कमी होणे आणि बैठी जीवनशैली ही पित्ताशयातील खडे निर्माण होण्यामागील महत्त्वाची कारणे आहेत. पोटदुखी, मळमळ, उलट्या आणि कावीळ ही या आजाराची काही सामान्य लक्षणे आहेत. ॲसिड रिफ्लक्सची लक्षणेदेखील काहीशी सारखीच असल्याने बऱ्याचदा उपचार घेण्यास विलंब होतो.

अनेकदा पित्त नलिकांच्या अडथळ्यामुळे त्वचा किंवा डोळे पिवळसर होणे यांसारखी लक्षणे दिसून येतात. ओटीपोटात अस्वस्थता जाणवत असल्यास लक्षणांचे नेमके कारण शोधण्यासाठी वेळीच तपासणी करणे आवश्यक आहे. औषधे या स्थितीचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकतात. बऱ्याचदा पित्ताशयातील खड्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते.

आम्लता आणि पित्ताशयातील खडे या दोन वेगळ्या आरोग्य समस्या असल्या तरी एकमेकांशी संलग्न आहेत. कारण या परिस्थितीमुळे अनेक रुग्णांमध्ये पोटदुखी, मळमळ आणि उलट्या यांसारखी समान लक्षणे दिसून येतात. तीव्र ॲसिडिटीच्या समस्या असलेल्या लोकांना पचनसंस्थेची जळजळ आणि दाह झाल्यामुळे पित्ताशयात खडे होण्याची शक्यता जास्त असते. औषधे आणि शस्त्रक्रिया हे पित्ताशयातील खड्यांचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकतात. तर ॲसिडिटीच्या समस्येवर अन्न सावकाश चावून खाणे, आम्लयुक्त पदार्थ आणि पेयांचे सेवन टाळणे, जेवणाच्या वेळेचे पालन करणे, धूम्रपान आणि मद्यपान कमी करणे आणि




जेवल्यानंतर लगेच न झोपणे याचे पालन करणे गरजेचे आहे.

**– डॉ. सतीश सोनवणे**

# पीसीओएस आणि मधुमेह

**आरोग्यवेध**

पीसीओएस म्हणजे पॉलिसिस्टीक ओव्हरियन सिंड्रोम. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव, ताणतणाव अशा अनेक कारणांमुळे महिलांमध्ये पीसीओएसचं प्रमाण वाढताना दिसत आहे. ही अत्यंत गंभीर समस्या आहे. पीसीओएसमुळे प्रजननक्षम वयातील महिलांना मधुमेह होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. अशा महिलांमध्ये मधुमेहाचं निदान खूप लवकर होऊ शकतं, असं एका अभ्यासात दिसून आलं. मासिक पाळीतली अनियमिता, चेहरा, छाती या भागांवरची अनावश्यक लव, गर्भधारणा न होणं, मासिक पाळीदरम्यान वेदना, ओटीपोटात गोळे येणं ही पीसीओएसची लक्षणं आहेत. यावर वेळीच नियंत्रण मिळवलं नाही तर मधुमेह, हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि अँड्रोमेंट्रिअल कॅन्सरचा धोका वाढतो.



स्वादुपिंड हा शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. स्वादुपिंडातून इन्शुलिनची निर्मिती होते. रक्तातली साखर विविध पेशींपर्यंत पोहोचवण्याचं काम हे इन्शुलिन करतं. पण शरीर इन्शुलिनला प्रतिकार करू लागतं तेव्हा पेशींमधील इन्शुलिन शोषून घेणारे घटक योग्य पद्धतीने काम करत नाहीत. यामुळे रक्तातल्या साखरेचा वापर करताना शरीराला बरेच अडथळे येतात. याला प्रतिसाद म्हणून स्वादुपिंडातून जास्त प्रमाणात इन्शुलिनची निर्मिती होऊ लागते. रक्तातल्या साखरेच्या योग्य वापरासाठी शरीराला सतत अधिकाधिक इन्शुलिनची गरज भासू लागते. इन्शुलिनच्या अतिप्रमाणामुळे शरीरात चरबी साठू लागते आणि रूग्ण स्थूल होतो. इन्शुलिनच्या अतिप्रमाणामुळे महिलांच्या शरीरातील प्रजननाशी संबंधित हार्मोन्सवर परिणाम होऊ लागतो. यामुळे मासिक पाळी अनियमित होते आणि पीसीओएसची लक्षणं दिसू लागतात. अर्थात ही लक्षणं व्यक्तिगणिक बदलतात. रक्तातील साखरेची पातळी सातत्याने वर्षभराच्या काळासाठी प्रमाणापेक्षा अधिक असेल तर रूग्ण मधुमेहाच्या पूर्व टप्प्यात येऊ शकतो. याचं रूपांतर पुढे मधुमेहात होतं. पीसीओएस आणि मधुमेहपूर्व टप्पा एकमेकांशी संबंधित आहेत.

जीवनशैलीत सकारात्मक बदल करून पीसीओएसला प्रतिबंध करता येऊ शकतो. तसंच या विकाराला नियंत्रणात ठेवता येऊ शकतं. अतिकर्बोदकयुक्त, स्टार्चयुक्त तसंच साखरयुक्त पदार्थांमुळे शरीर इन्शुलिनचा प्रतिकार करू लागतं. उच्च फायबरयुक्त पूर्णधान्य, डाळी, स्थानिक, हंगामी फळं, भाज्या यांचं सेवन करावं. कठीण कवचयुक्त फळं, जवस, ओमेगा थ्री फॅटी ॲसिडयुक्त मासे तसंच डाळी, अंडी, बीन्स, दुग्धजन्य पदार्थ, चिकन यांचा आहारात समावेश करता येईल. कोला, मद्य, साखरयुक्त, प्रक्रिया केलेले, हवाबंद पदार्थ आणि डबाबंद फळांचे रस टाळावे. स्वयंपाकघरात प्लास्टिकचा वापर जवळपास टाळावा. नियमित व्यायाम करावा. ताणतणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करावे. पुरेशी झोप घ्यावी. फॅड डाएटच्या मागं लागू नये. अशा उपायांनी पीसीओएसला आळा घालता येऊ शकेल.

# ब्रेनस्ट्रोकचा धोका वाढतोय

उत्तर भारतामध्ये उष्णतेने कहर केला होता. तिथे ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास किंवा त्यापेक्षा जास्त तापमान होते. अशा वातावरणामुळे ब्रेनस्ट्रोकचा धोका संभवतो. अतिउष्णतेमुळे शरीरामध्ये निर्जलीकरण होते. परिणामी, रक्त घट्ट होण्याचा धोका असतो. रक्त परिसंचरण मंद होऊ शकते. त्यामुळे काही गंभीर परिस्थितींमध्ये ब्रेनस्ट्रोकचा धोका वाढू शकतो.

उष्माघातामध्ये शरीराचे तापमान खूप वाढते. ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान असल्यास मेंदू आणि मज्जासंस्थेवर धोकादायक परिणाम होऊ शकतात. शरीर स्वतःला थंड ठेवू शकत नाही, तेव्हा पाण्याची तीव्र कमतरता निर्माण होते. उष्माघातामुळे दोन प्रकारचे ब्रेनस्ट्रोक होण्याचा धोका आहे. शरीरात पाण्याची कमतरता आणि रक्तात पाणी कमी असल्यामुळे मेंदूपर्यंत रक्त वाहून नेणाऱ्या नसा आकुंचन पावतात. त्यामुळे



रक्त घट्ट होऊन शिरांमध्ये गोठू शकते. ॲनिमिक स्ट्रोक किंवा रक्तस्त्राव स्ट्रोकचा धोका असतो. रक्तस्त्राव स्ट्रोकचे दोन प्रकार आहेत. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, हृदयविकार, श्वास घेण्यास त्रास होणाऱ्यांना किंवा दारू आणि सिगारेटचे सेवन करणाऱ्यांना उष्माघातामुळे ब्रेनस्ट्रोकचा धोका जास्त असतो. त्यामुळे अशा लोकांनी सावध राहावे.

**– डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

# लैंगिक समस्या भेडसावतायत...

उभारतीय जोडप्यांमध्ये आजकाल लैंगिक समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामध्ये लैंगिक इच्छा कमी होणे, उत्तेजना कमी होणे, संभोगादरम्यान किंवा नंतर वेदना होणे या तक्रारी जाणवतात. सुमारे ३५ टक्के पुरुष आणि स्त्रिया अशा लैंगिक समस्यांनी ग्रासले आहेत.

'इन विट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) सारख्या उपचारांमुळे मानसिक आणि शारीरिक तणाव येऊ शकतो. परिणामी लैंगिक कार्यात बिघाड होतो. तणाव, मधुमेह, हार्मोन्समधील बदल आणि रक्तवाहिन्यांवर परिणाम करणाऱ्या समस्यांमुळे लैंगिक समस्या दिसून येतात. लैंगिक कार्यात बिघाड होण्यामागच्या कारणांमध्ये हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी रोग, मधुमेह, मूत्रपिंड निकामी होणे, यकृत निकामी होणे, कर्करोग आणि त्यावरील उपचार, हार्मोनल असंतुलन कारणीभूत ठरू शकते.

तणाव, चिंता, नैराश्य, लैंगिक समाधान न झाल्याची भावना, वैवाहिक किंवा नातेसंबंधातील समस्यादेखील लैंगिक कार्यात बिघाड निर्माण करतात. लैंगिक ताठरता टिकवण्यास असमर्थ ठरणे किंवा शीघ्रपतन या समस्यांमुळे शारीरिक संबंधासाठी उत्तेजित होऊनही इरेक्शन न होणे हे दोन्ही पार्टनरला असंतुष्ट करतात. तसेच शुक्राणूंना अंड्यापर्यंत पोहोचू देत नाही. परिणामी, गर्भधारणेमध्ये अडथळे निर्माण करतात. स्त्रियांना संभोग करताना योनिमार्गात कोरडेपणा, कामोत्तेजनाचा अभाव, दोघांचीही लैंगिक इच्छा नसणे, वेदनादायक संभोग आणि उत्तेजनासंबंधी समस्या उद्भवू शकतात.

**– डॉ. प्रसन्न नेने**

# प्रचंड उकाड्याचा परिणाम

यावर्षीच्या उकाड्याने सगळ्यांनाच हैराण करून सोडले होते. उन्हाच्या प्रचंड झळांनी नागरिक हैराण झाले होते. उष्णतेच्या लाटेने मनोरुग्णांमध्ये प्रचंड चिडचिड दिसून आली. बऱ्याच शहरांमध्ये उकाडा सहन न होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. सर्वसामान्य माणसाने या उकाड्यापासून बचावाचे काही ना काही उपाय शोधले. मात्र मानसिक आजाराने पीडित मनोरुग्ण या परिस्थितीत हैराण झाल्याचे चित्र बघायला मिळाले. या उकाड्यात मानसिक आजारावर उपचार घेऊन गेलेल्या लोकांना पुन्हा काही ना काही त्रास जाणवू लागले. गेल्या काही महिन्यांमध्ये मनोरुग्णांची संख्या वाढली आहे. झोप पूर्ण होत नाही, लवकर राग येतो, थकवा येतो, मन विचलित होते ही जास्त तापमानामुळे होणाऱ्या परिणामांची लक्षणे आहेत. मनोरुग्णांना दिल्या जाणाऱ्या औषधांमध्ये लिथियम सॉल्ट नावाचे तत्त्व असते. यामुळे त्यांच्या शरीरात मुबलक प्रमाणात पाणी असणे आवश्यक असते. परंतु रुग्ण बरे झाल्यानंतर ते स्वत: किंवा त्यांचे कुटुंबीय याकडे दुर्लक्ष करतात. अनेकदा रुग्ण वेळेवर औषधे घेत नाहीत. तापमान वाढल्याने तणावग्रस्त होतात. परिणामी, त्यांच्यात मनोरुग्णासारखी लक्षणे पुन्हा दिसू लागतात. त्यांना उष्माघाताचाही धोका असतो. शरीराचे तापमान वाढल्याने मनोरुग्णांचा स्वभावही बदलतो. ते छोट्याछोट्या गोष्टींवरही वाद घालू लागतात.

**– डॉ. मोहन सहस्त्रबुद्धे**

# खाली पडलेला पदार्थ खावा का?

**आपण कुठे चुकतो?**

फळाचा, मिठाईचा तुकडा किंवा खायचा कोणताही पदार्थ आपण हातात घेतो. तो तोंडात टाकणार तोच खाली पडतो. क्षणाचाही वेळ न घालवता आपण तो पदार्थ उचलतो आणि तोंडात टाकतो. कारण आपल्याला पाच सेकंदांचा नियम माहीत असतो. खाली पडलेला कोणताही खाद्यपदार्थ पाच सेकंदांच्या आत उचलला तर तो खाण्यायोग्य असतो, असं हा नियम सांगतो. खाली पडलेला पदार्थ वाया जाऊ नये या उद्देशाने आपण तो खातो. पण ही कृती चुकीची आहे. पाच सेकंदांचा नियम तुम्हाला रोगांपासून मुक्त ठेऊ शकतो, असं ठामपणे सांगता येत नाही. कारण दूषित पृष्ठभागावर पडलेला कोणताही पदार्थ अगदी काही क्षणांमध्ये जंतूंच्या संपर्कात येतो.

विशिष्ट प्रकारचा पदार्थ दूषित पृष्ठभागावर पडल्यानंतर लगेच बॅक्टेरियांच्या संपर्कात येतो. काही पदार्थ पाच सेकंदांपेक्षा कमी वेळात जंतूंच्या संपर्कात येतात. साल्मोनेला जंतू पृष्ठभागावर महिनाभर टिकून राहू शकतात. हे जंतू खाद्यपदार्थातून शरीरात गेले तर उलट्या, मळमळ, जुलाब, पोटदुखी असे विकार उद्भवू शकतात. २०१६ मध्ये या संदर्भात एक संशोधन करण्यात आलं. या संशोधनासाठी कलिंगड, साधा ब्रेड, बटर लावलेला ब्रेड आणि च्युइंग गम असे पदार्थ निवडण्यात आले. हे पदार्थ वेगवेगळ्या पृष्ठभागांवर ठेवण्यात आले. या पदार्थांच्या संपर्कात येणाऱ्या जंतूंचा अभ्यास यावेळी करण्यात आला. ओलावा असलेल्या ठिकाणी बॅक्टेरिया लवकर आकर्षित होत असल्याने कलिंगडात सर्वाधिक जंतू होते.

जमिनीवर पडलेला पदार्थ पाच सेकंदाच्या आत उचलून खाल्ला तर कोणताही त्रास होत नाही, हा तर्क चुकीचा आहे. पदार्थाचा प्रकार, पृष्ठभाग, पृष्ठभागावरच्या जंतूंची संख्या अशा अनेक बाबींवर पदार्थाचा जंतूंशी येणारा संपर्क अवलंबून असतो. पृष्ठभागावर किती आणि कोणते जंतू आहेत याचा अंदाज येत नसल्याने खाली पडलेला पदार्थ न खाणं योग्य ठरतं.

# लहान मुलांमधली पोटदुखी

**आरोग्यमंत्र**

लहान मुलांना पोटदुखीची समस्या भेडसावते. ही समस्या सर्वसाधारणपणे तीन ते नऊ या वयोगटातील मुलांमध्ये दिसून येते. या पोटदुखीची बरीच कारणं असतात. गॅस, अपचन, जंत, आहार आणि ताण अशा कारणांमुळे लहानग्यांना पोटदुखी होऊ शकते. बरेचदा ही पोटदुखी आपोआप बरी होते किंवा काही घरगुती उपायांनी नियंत्रणात येते. पण ही वारंवार उद्भवत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.

अपचन हे पोटदुखीचं अत्यंत महत्त्वाचं कारण असतं. अतिखाणं, शीतपेयांचं अतिसेवन, जंक फूडचं सेवन यामुळे पोटदुखी होऊ शकते. मात्र, साध्या उपायांनी ही पोटदुखी बरी होते. गरम पाणी पिणं, पोटाला शेक देणं, अपचनाची औषधं घेणं या उपायांनी अशा पोटदुखीवर नियंत्रण मिळवता येतं. बद्धकोष्ठता हे सुद्धा मुलांमधील पोटदुखीचं कारण असू शकतं. यात पोट साफ न झाल्याने त्रास होऊ शकतो. पाण्याचं प्रमाण वाढवणं, तंतूमय पदार्थांचं सेवन अशा उपायांनी बद्धकोष्ठता बरी होते.



गॅस्ट्रोएंटेरिटीज हा विकार जीवाणू किंवा विषाणूंच्या संसर्गामुळे होऊ शकतो. डायरिया, ओटीपोटात तीव्र स्वरूपाचे गोळे येणं, उलट्या, ताप ही या विकाराची लक्षणं असतात. शौचाची तपासणी केल्यानंतर या विकाराचं निदान होतं.

पोटातील जंत हे सुद्धा पोटदुखीला कारणीभूत ठरू शकतात. लहान मुलांमधल्या पोटदुखीचं हे महत्त्वाचं कारण असतं. अस्वच्छ वातावरणात राहणाऱ्या मुलांना जंतांची समस्या भेडसावते. औषधोपचारांनी जंतांवर नियंत्रण मिळवता येतं.


सातत्याने उद्भवणारी पोटदुखी किंवा ओटीपोटातील वेदना ही समस्या आठ ते १५ वर्षांच्या मुलांमध्ये आढळते. मुलांपेक्षा मुलींमध्ये या विकाराचं प्रमाण जास्त आहे. यात तीन ते चार महिन्यांच्या काळात सातत्याने तीव्र स्वरूपाच्या वेदना जाणवतात. या काळात किमान तीन ते चार वेळा तीव्र स्वरूपाची पोटदुखी जाणवते. डोकेदुखी आणि उलट्या अशी लक्षणंही यासोबत जाणवतात. काळजी, चिंता, अस्वस्थता अशा मानसिक कारणांमुळे ही पोटदुखी उद्भवते. विशिष्ट खाद्यपदार्थांच्या ॲलर्जीमुळे हा त्रास होऊ शकतो. अनेकांना दुधाची ॲलर्जी असते. कृत्रिम प्रिझर्व्हेटिव्हजमुळे मुलांना पोटदुखीचा त्रास होऊ शकतो. विशिष्ट प्रकारच्या औषधांमुळेही पोटदुखी होऊ शकते.

तीव्र स्वरूपाची, सातत्याने उद्भवणारी तसंच दोन तासांपेक्षा जास्त काळ राहणारी पोटदुखी असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय मुलांना कोणतीही औषधं देऊ नये. वेदनाशामक औषधांमुळे समस्या अधिक गंभीर होऊ शकते. या आजारात तातडीचा उपाय म्हणून मुलांना झोपवा. त्यांना आराम करू द्या. मुलांच्या पोटावर गरम पाण्याची बाटली किंवा पॅड ठेवा. साधारण २० मिनिटांपर्यंत हा उपाय करा. त्याच बरोबर मुलांना द्रव पदार्थ देण्यानंही आराम पडू शकतो.

**नवसंशोधन**

## एचआयव्ही निदानासाठी नवं उपकरण!

एचआयव्ही एड्सचं निदान करणाऱ्या पारंपरिक चाचण्या बऱ्याच खर्चिक असतात. म्हणून शास्त्रज्ञांनी छोट्या आकाराचं, परवडणाऱ्या दरातलं एचआयव्हीचं निदान करणारं उपकरण तयार केलं आहे. स्मार्टफोन आणि नॅनोटेक्नॉलॉजीचा वापर करून हे उपकरण विकसित करण्यात आलं आहे. हे उपकरण एचआयव्हीचं निदान करू शकतं. तसंच रूग्णाच्या औषधोपचारांवर लक्ष ठेऊ शकतं. एचआयव्हीशी संबंधित चाचण्यांच्या सुविधा तसंच औषधोपचार पुरेशा प्रमाणात नसलेल्या भागांमध्ये हे उपकरण लाभादायी ठरू शकतं. एचआयव्हीग्रस्त रूग्णांसाठी हे उपकरण वरदान ठरू शकतं.




**डोळ्यांचं आरोग्य**



## उच्च रक्तदाब आणि डोळ्यांचं आरोग्य

उच्च रक्तदाबामुळे डोळ्यांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. उच्च रक्तदाबामुळे रेटिनातल्या रक्तवाहिनीचं नुकसान होऊ शकतं. उच्च रक्तदाबामुळे होणाऱ्या नेत्रविकारांना 'हायपरटेंसिव्ह रेटिनोपॅथी' असं म्हणतात. रक्तदाबाच्या प्रमाणावर या विकाराची तीव्रता अवलंबून असते. रक्तदाब जास्त तितका डोळ्यांना असणारा धोका वाढतो. त्यामुळे रक्तदाबावर नियंत्रण ठेऊन डोळा जपायला हवा.

**दंतारोग्य**

## अंगठा चोखण्याची सवय घातक

लहान मुलं अंगठा चोखतात. अंगठा चोखल्यामुळे सुरूवातीला फारसे दुष्परिणाम होत नसले तरी ही सवय कायम राहिली तर मुलांचे दात खराब होऊ शकतात. लहान मुलं बोटं चोखतात. कपडे, खेळणी तोंडात घालतात. मुलांची ही सवय ती पाच वर्षांची होईपर्यंत थांबवायला हवी. बोटं चोखण्याच्या सवयीचा मुलांना भविष्यात त्रास होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी गोडीगुलाबीने मुलांची ही सवय सोडवायला हवी.



**आजीबाईंचा बटवा**

## उपयोग वेलचीचे

गोड पदार्थ, चहा तसंच विविध खाद्यपदार्थांमध्ये वापरला जाणारा साधासा घटक म्हणजे वेलची. ही इवलीशी वेचली खूप गुणकारी आहे. थंडीत घसा खवखवणं, कोरडा खोकला, सर्दी, कफ अशा समस्या निर्माण होतात. या समस्यांवरचा रामबाण उपाय म्हणजे वेलची. वेलचीत भरपूर अँटीऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे सर्दी–खोकल्याला प्रतिबंध करण्यासाठी आहारात वेलचीचं प्रमाण वाढवायला हवं. थंडीत वेलची घातलेला चहा प्या. दाह कमी करणाऱ्या गुणधर्मामुळे अस्थमा आणि तीव्र स्वरूपाची सर्दी वेलचीच्या नियमित सेवनाने आटोक्यात येऊ शकते. पचनाशी संबंधित समस्या यामुळे दूर होऊ शकतात.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11